December 31, 2012

स्त्री-पुरुष आकर्षणाला प्रेम म्हणा आणि तीव्र आकर्षणाला लव्ह म्हणा -- किंवा उलटे ! आकर्षण नसलेली स्त्री-पुरुष आपुलकी असेल ( आणि असू शकत असेल ) तर मैत्री म्हणा ! -- मग काय प्रॉब्लेम राहील ?

मी गोंधळलेला आहे, माझे निश्चित मत तयार नाही, ( मला या प्रश्नाच्या अनेक बाजूही कळत नाहीत ), पण माझे निश्चित मत सक्तीने मागितले जातेय -- आणि प्रश्न तातडीचाच आहे -- काय करावे ?

December 30

मी इथे फेसबुकवर कुणाशी भांडायला अथवा मीच कसा चांगला, सुबुद्ध -- असे काही दाखवायला, वावरत नाही -- मी कसा फालतू आहे, हे कुणालाही सिद्ध करायचे असेल तर मी नुसता दुजोराच देणार नाही तर त्याचे म्हणणे सत्य असल्याचे सिद्धही करण्याचा ( शाब्दिक ) प्रयत्न करेन -- फ्रेंडसशी बोलणे, एवढाच, म्हटला तर, हेतू आहे --

December 27

ताणतणाव आणि मानसिक विदीर्णता अधिकाधिक वाढताहेत, हे निर्विवाद आहे. हे अर्थातच त्रासदायक आहे. स्वतःच्या या अति-त्रस्त मनःस्थितीतून पूर्णपणे सुटण्याचा क्षण फक्त संभोगातच उपलब्ध आहे. शिवाय आपली समाजस्थिती मोकळी वगैरे झालेली नाही. बंधने खूप आणि हाव खूप, अशी अवस्था आहे. या प्रकारात, एकूणात, लिंगसंबंधांच्या क्षेत्रातले प्रश्न अत्यंत तीव्र होणार, असे दिसते आहे. चहूबाजूंनी दिसणारी आकर्षणे पाहता, खूपजण यातले ' वंचित ' म्हणावे लागतील, असे आहेत. हे जर खरे असेल तर या अंगाने विचार मांडताना कुणीच का दिसत नाही ?

December 26

शिक्षा कडक करणे, मुलींनी मिरची पूड वा एखादे छोटे शस्त्र जवळ बाळगणे, साध्या वेषातले पोलीस वाढवणे -- अशा काही उपायांची चर्चा होत आहे -- त्याच विभागात एक सुचवावेसे वाटते -- सेक्स टॉईज खूप स्वस्तात देणे, अथवा, विशेषतः मोठ्या शहरांमध्ये, आरोग्यव्यवस्थेसह, ठिकाणांसह, फ्री उपलब्ध ठेवणे, उपयोगी पडू शकेल का ? याबाबत माझे काही निश्चित मत नाही, पण आलेय मनात तर फ्रेंडसमध्ये बोलावे, एवढ्याच हेतूने ही पोस्ट देत आहे.

December 25

त्रस्त मनःस्थिती म्हणजेच अहंकार !

December 24

मी लोकांबरोबर आहे ! आत्मकेंद्री नाही !

December 23

जागतिक प्रायोगिक नाटकाबद्दल ' अक्षरवाङ्मय ' चा विशेषांक निघत असल्याची माहिती मी काही दिवसांपूर्वी दिली होती. त्या अंकाच्या प्रकाशन-सोहळ्याचे निमंत्रण खाली दिले आहे. यात आपल्या इथल्या एफबी फ्रेंड नीरजा पटवर्धन आणि मी -- आमचेही लेख आहेत. जमेल त्यांनी जरूर यावे, ही संपादकांतर्फे विनंती.

आपण सर्वांनी इथे एफबीवर माझ्याशी संवाद साधला होता -- मुलाखत घेतली होती, हे आपल्याला आठवत असेलच. ती मुलाखत ' खेळ ' च्या दिवाळी अंकात आलेली आहे. त्याचे संपादक मंगेश नारायणराव काळे यांनी आपणा सर्वांना धन्यवाद दिलेले असून ते आपल्याला हा अंक देऊ इच्छितात. तरी आपण सर्वांनी त्यांच्या ९७६६५९४१५४ या मोबाईलवर त्यांच्याशी संपर्क साधावा, ही विनंती. धन्यवाद !

December 22

काही लोकांचे आयुष्य हे समारंभमय असते -- मधे मधे मिळणाऱ्या मोकळ्या वेळात ते पैसे मिळवत असतात !

December 20

माझे मन डेड झाले की जगबुडीच ती ! आप मरे तो डूब गयी दुनिया !

प्रत्येकाचे मत, इच्छा, अपेक्षा काहीही असल्या तरी सामान्य आणि बिझी अशा सगळ्यांना हे स्वीकारावेच लागते की दिवसाचे फक्त चोवीसच तास असणार !

December 18

आहेत ते सगळे चमत्कारच आहेत, असे समजा नसेल वाटत, पण आजच्या जगातही, मधेच, क्षणभर का असे ना, मन स्वस्थ असते ( निसर्गदृश्य पाहून का असे ना ), हा चमत्कार नाही ?

December 17

रोज सुमारे २५-३० पांढरे पक्षी ( कदाचित कबूतरेही असतील ) सुमारे ४-५ तास एका ठराविक भागात इकडेतिकडे फिरताना दिसतात -- ते एवढ्या वेगात असूनही एक शिस्त दिसते -- एकमेकांवर आपटून त्यांचा कधीच अपघात होत नाही -- काय करत असतात ते ? सकाळचा व्यायाम ? की उडण्याचा सराव ?

December 16

तुम्हाला तुमच्या कामातून ना प्रसिद्धी मिळत ना पैसा -- मग काय असणार आहे ते असून असून -- तुम्ही वाढदिवस आणि सत्यनारायण अशी फंक्शन्स अटेंड करायला काय अडचण आहे ?

December 14

बँकेत नोकरी करून निवृत्त झालेले एकजण भेटले. आमची काही वर्षांपूर्वीची ओळख होती. प्राथमिक बोलणे झाल्यावर थोडे कामाचेही विषय निघाले. ते म्हणाले, “ ऐका खेड्यात मी ब्रँचमॅनेजर म्हणून काम करत होतो, तेव्हाची गोष्ट आहे. त्या खेड्यात तिथले न्हावी घरोघर जाऊन सेवा देत पण मागासवर्गीयांची कटिंग करत नसत. त्यांना जमेल तशी एकमेकांची करावी लागे. तिथे सलून नव्हते. कारण हेच – सलून काढले तर त्यांची कटिंग करावी लागेल, नाकारता येणार नाही. हे पाहून, मी माझ्या अधिकारात एक स्टँडिंग ऑफर देऊन ठेवली होती की, जो कुणी हेयर कटिंग सलून टाकू इच्छित असेल त्याने आज सांगावे – उद्या कर्ज घेऊन जावे. माझ्या कार्यकाळात तिथे पहिले सलून सुरू झाले ! “ “ हे छानच झाले “, मी म्हणालो. “ अशी कित्येक कामे आपण करत असतो, त्याचे श्रेय त्या त्या संस्थेचे, सरकारचे असते, हे मान्य, आपण हे सांगतही फिरत नाही – पण आपला ऍप्रोच महत्त्वाचा असतोच ना ! “ “ प्रश्नच नाही “, मी म्हणालो. “ बरोबरच आहे. “ मी पुढे म्हणालो. “ अहो, एक सामाजिक काम करणारा माणूस भेटला होता – तो मला म्हणत होता की, तुम्ही खुर्चीवर बसून आत्मकेंद्री आयुष्य जगलात, तुम्ही समाजाभिमुख झाला नाहीत – तुम्हाला काय कळणार समाजाचे प्रश्न ? “ आता माझ्या लक्षात आले. “ असतात असे काही कार्यकर्ते – त्यांना वाटते की तेच फक्त समाजाचे तारणहार ! “ – मी म्हणालो .

“ अहो तेवढेच नाही – मलाच सगळे समजते असे वाटणे, दुसऱ्यांना तुच्छ लेखणे, आत्मप्रौढी, मग्रुरी आणि उर्मटपणाही असतो ! म्हणजे ते सोडून बाकीचे सगळे नालायक आहेत, असे दाखवत असतात ! खूप माणसे आपापल्या कार्यकक्षेत अशी खूप चांगली कामे करत असतात, हे त्यांना माहीतच नसते ! “ “ दुर्लक्ष करायचे त्यांच्याकडे – त्यांच्या सर्टिफिकेटची आपल्याला काय गरज ? “ – मी म्हणालो. “ तेच केले – “ – ते म्हणाले !

मी कसाही वागलो ( खून, बलात्कार सोडून ) तरीही मला चांगलाच म्हणेल, अशी व्यक्ती असेल कुणी ?

December 11

' सम्यक ' या शब्दाचे अर्थ काय काय असू शकतील ? ' अपूर्ण ' असाही एक अर्थ असेल का त्यात ? ' सम्यक ' असे काय काय असू शकेल ?

December 7

जनाचे ऐकले तरी चुकतेय, मनाचे ऐकले तरी चुकतेय ! नेहमी हमखास पूर्ण बरोबरच असणारे असे काही असेल काय ?

हिंसा असणारच हो, अन्याय असणारच, स्वार्थ, वर्चस्व, दबाव -- हे सगळे असणारच हो -- त्याशिवाय कुठले आलेय माणसाचे जगणे ? आणि नुसत्या शांत जगण्यात मजा तरी काय असणार आहे ? कंटाळवाणे होईल सगळे ! -- होय ना ? मग कसले डोंबलाचे ( खरे तर इयाटाचे ) परिवर्तन करायचेय ?

December 6

भावनिक अवलंबित्व भीतीयुक्तच असते !

फेसबुक हे एक आकाश आहे -- आले ते आले, गेले ते गेले -- जणू काही ही आपली संपत्ती आहे, असा भ्रम हवाय कशाला ?

December 5

समक्ष भेटीत वेळेची, औपचारिकतेची, विषयांची, वगैरे बंधने येतात ( मैत्रीतल्या, संध्याकाळनंतरच्या बैठकी वगळून ) -- इथे फेसबुकवर खूपच मोकळे मैदान असते ! फेसबुक हे संवादाचे एक खूपच वेगळे आणि समृद्ध दालन खुले झाले आहे, असे वाटते. अनेक स्त्री-पुरुष एखाद्या विषयावर कधी गंमतीत कधी गंभीरपणे बोलताहेत, असे इतरत्र फारसे दिसत नाही. आणि तेही भौगोलिक अंतर कितीही असले तरी !

December 3

विनोदी विरुद्ध गंभीर.
हलकेफुलके विरुद्ध जड.

December 2

वाट पाहणे हेही जगणेच की जगणे स्थगित होणे ?

November 2012
November 30

Chitra Rajendra Joshi --- -- यांच्या पोस्टवर दिलेल्या कॉमेंटवरून ही पोस्ट देत आहे --
ज्येष्ठ विवाहित जोडप्यांमधली एक व्यक्ती निवर्तल्यावर उरलेल्या व्यक्तीला एकाकी वाटण्याचा हा प्रश्न. आजच्या काळाच्या माहोलामुळे वाढणारी त्याची तीव्रता. त्यांनी अशा परिस्थितीत लिव्ह इन रिलेशनशिपचा पर्याय हाताळावा, असा विचार समोर ठेवणारी, सोबत -- ' मिळून साऱ्याजणी ' तला लेख असलेली अशी ही पोस्ट होती. स्थलकालपरिस्थितीनुरूप प्रश्न आणि त्यांची स्वरूपे बदलणे, वागण्याच्या व नीतीच्या कल्पना बदलणे, हे होतच राहते – त्यात काहीजण पायाचे दगड वा धाडसी प्रवर्तकही होतात. पुढे ती वाट रुळते, त्यातले आश्चर्य कमी होत जाते, तसे याही बाबतीत होईल, असे वाटते. असे आणखी काही प्रश्नही वातावरणात आहेत पण ते सर्वमान्य नैतिक रचनेला धक्का लावणारे असल्याने त्यांबद्दल कुणी फारसे बोलत नाही. विवाहाचे साधारण वय लक्षात घेतले तर त्या वयात कुणाचीच विशेष योग्यता वा क्षमता सिद्ध झालेली नसते, स्वतःच्याही आवडीनिवडी, विचार समजणे चालू असते, नात्यात कशा प्रकारचे प्रश्न येऊ शकतात याची नीटशी कल्पना नसते. अशा अवस्थेत तात्कालिक आकर्षण, परिस्थितीचा वा व्यक्तींचा दबाव, अशा कारणांनी बरेचसे विवाह संपन्न होतात. विशेषतः स्त्रियांचे शिक्षण वा व्यक्तिविकास एकूणच कमी असण्याच्या काळात ते तसेच धकूनही गेले असेल. आता प्रौढ

वयात अनेकांना आपली निवड चुकलेली आहे, हे प्रकर्षाने जाणवत असते. त्याचबरोबर संसार वाढलेला असतो, मुलेबाळेही असतात आणि त्यांचे प्रश्न आघाडीवर असतात. अशा वेळी मोडतोड वा घटस्फोट या मार्गाने जाणे योग्य वाटत नाही. पण मन असमाधानी व क्षुब्ध राहते. या परिस्थितीत त्या स्त्री व पुरुष विवाहितांनी नवी मैत्री करणे, त्या नव्या संबंधित व्यक्तीबरोबर एकत्र राहणे – असे का घडू नये ? याचे काय परिणाम होऊ शकतील ? – हाही चर्चेचा विषय होऊ शकतो.

असे खूपच विषय असू शकतील आणि त्यांवर न्याय्य मार्ग निघावे असेही वाटू शकेल – ते होतही राहील। तरीही आयुष्य प्रश्नहीन होईल असे नाही आणि एका प्रश्नातून मार्ग काढता काढता दुसरे अनेक प्रश्न निर्माणही होऊ शकतील. ही सर्व प्रक्रिया चालू आहे आणि चालू राहीलच. याचबरोबर, असे स्थलकालपरिस्थितींच्या प्रश्नांत आयुष्य गाडले न जाता जगणे शक्य आहे का, हाही प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे, असे वाटते.

संबंधांतल्या आणि कामांतल्या धोक्यांवर मन खूप साधकबाधक विचार करते, आपले बरोबर असल्याचे कसे दाखवता येईल, हे ठरवत राहते -- याचा खरेच काही उपयोग असतो की याला शक्तीचा अपव्यय म्हणावे ?

November 29

पूर्णतेचे क्षण क्वचित, अपूर्णतेचा काच सतत --

November 27

आज मूड असा आहे, आज मूड तसा आहे -- मूड बदलत राहतात -- त्यांच्यावर आपला कंट्रोल नसतो -- आपल्या इच्छेवर ते अवलंबूनच नसतात. आपल्या जगण्याच्या माध्यमातून भुतांसारखे मूड जगत राहतात !

November 26

कालचा दिवस सुखात / आनंदात गेला, ते ठीकच झाले, पण आजचाही तसाच जावा, असे वाटत आजच्या दिवसाची सुरुवात होणे, हा प्रॉब्लेमच होतोय ! ताजेपणाच जातोय !

November 2012

"सगळ्या मानवी प्रश्नांचे मूळ एकच असेल की प्रत्येक प्रश्नाचे वेगळे मूळ, वेगळे रूप आणि वेगळे निराकरण असेल ? आणि कोणताही प्रश्न समजून घेण्याच्या पद्धतीच हजारो असतील तर त्या त्या प्रश्नाचे कोणते निराकरण श्रेष्ठ समजावे ?"

"बाब छोटी असो की मोठी, बरोबर-चूकचा प्रश्न येतोच कुठे ? कारणे, समर्थने असतातच ! रेटून, मोठ्या आवाजात आपणच बरोबर, हे बिंबवतच राहायचे ! संघर्षाला कंटाळून बऱ्याच वेळी सामने बरोबरीत सुटतात ! सगळ्यांनाच असे जगण्यात यश मिळाले तर भांडणे कमी होतील, स्वर्ग अवतरेल !"

November 21

"१. दबून राहा, नादी लागू नकोस, कशाला कटकट, आला दिवस जाईलच.
२. थोडा विरोध, प्रतिकार कर पण नोकरी-धंदा संभाळून, आणि फारसा धोका नकोच.
-- या दोन्हीच्या दरम्यान जगावे, म्हणजे बरे चालते. आपण गेल्यावर " होता की नव्हता, कळलेही नाही बिचारा " इथपासून ते " मते बाळगायचा, पण ठीक होता " -- एवढ्या क्षेत्रातच आपल्याबद्दल प्रतिक्रिया याव्यात ! आपल्याला थोडेच लोकोत्तर व्हायचेय !"

November 18

"थोडेफार कमीजास्त इकडेतिकडे होते खरे, फार बिघडत नसेल, तर हेच नॉर्मल !"

November 16

"जगण्यातल्या, छोट्या समजल्या जाणाऱ्या प्रश्नांतूनच तर, तथाकथित मोठे प्रश्न समजण्याचा मार्ग नसेल ?"

November 15

"एका वाक्यात आत्ता महत्त्वाचे वाटणारे काही बोलावे --
उदा -- चीनमध्येही भ्रष्टाचार आणि आर्थिक विषमता वाढत असेल तर माणसाने स्वप्न पाहावे तरी कसे ?"

November 13

"संध्याकाळी एक चक्कर मारून आलो. रस्त्यात लांबून समोरून दोन स्त्रिया येताना दिसल्या. नवे कपडे, मेकप वगैरे. नंतर मी लक्ष दिले नाही. क्रॉस होताना त्या बाई म्हणाल्या, " ओळखलं नाहीत वाटतं -- ". त्या माझ्या ओळखीच्याच होत्या. " अरे, तुम्ही होय ! तुम्ही दोघी इतक्या ब्यूटिफुल दिसताय, म्हटलं, कोण आहेत कोण जाणे ! " माझ्या या उत्स्फूर्त वाक्याने त्या दोघींना इतके छान हसू आले की त्यात माझा दिवसच साजरा झाला, असे मला वाटले. त्यांच्याबरोबर होती ती त्यांची कॉलेजात जाणारी मुलगी होती. त्यांनी तिची ओळख करून दिली, काय शिकते, ते सांगितले. मग शुभेच्छांची देवाणघेवाण करून आम्ही आपापल्या मार्गाने गेलो. मी ते वाक्य म्हणून गेलो खरे उत्स्फूर्तपणे, पण तसे पाहिले तर किती दडपणे आहेत ! " छान ! " म्हणता यायलाच हवे !"

November 12

"बुद्धीने आपण स्वतःच्या आणि इतरांच्या ' खऱ्या ' प्रतिमा बाळगतो -- आणि त्या खोट्याच असतात ! प्रतिमा एकमेकांचे वाटोळे करत राहतात !"

November 11

दुःख, अपमान, हानी, दुरावा, काही गमावल्याची भावना, फसवणूक वा विश्वासघात झाल्याचे सलणे, आपला दोष नसताना नुकसान झाल्याची खंत -- असे काही ना काही जगण्यात घडत असते. अशा वेळी मन त्यातच घिरमिटत राहून स्वछळाची विनाशक प्रक्रिया चालू ठेवते. थांबतच नाही, आणि थांबवायचा प्रयत्न केला तर ती प्रक्रिया अधिकच तीव्र होते. यांतले काही ना काही प्रत्येकाने अनुभवलेले असते.अशा वेळी करण्यासारखी माझ्या लक्षात आलेली एक गोष्ट सांगतो. याला शास्त्रीय आधार नाही, पण वाटल्यास पाहण्यासारखे आहे. अनुभवातून असे काही लक्षात आलेले, सांगितले तर आपण मूर्ख वा वेडे ठरू या भीतीने सांगितले जात नाही. पण ते सांगावे, असे मला वाटते. वर वर्णन केलेल्या मानसिक स्थितीच्या वेळी त्या वेळच्या तात्कालिक प्रश्नाकडे पूर्ण दुर्लक्ष करून आपल्या डोक्याच्या वरच्या, जवळपासून ते दूरपर्यंतच्या, आकाशाकडे कल्पनेने लक्ष द्यावे -- असे केल्यास काही क्षणांतच ती स्वछळ प्रक्रिया नष्ट होते. अशा संकटघटनेची वाट न पाहता एरवीही हे करून पाहण्यासारखे आहे. मला असे वाटते की आपल्या अनेक फ्रेंडसना त्यांच्या त्यांच्या अनुभवातून समजलेले असे काही ना काही असू शकेल. इतरांना त्यात तथ्य वाटो न वाटो, ते इथे सांगितले जावे, असे वाटते. ज्यांना असे काही लक्षात

आलेले आहे, ते त्यांनी निःसंकोचपणे इथे सांगितले तर हा एक चांगला समजसंग्रह तयार होईल. तरी, ज्यांना असे काही सांगणे शक्य आहे त्यांनी जरूर सांगावे.

November 9

"अपेक्षा आहेत तोवर मूड, खिन्नता, भीती, असुरक्षितता, संरक्षणाचे प्रयत्न आणि वैताग, राग, संताप, हिंसा -- हे सगळे असणारच ! यात कसली ( इयाटाची ) भूमिका घेणार ? -- हे जरा मन ढिले असण्याच्या क्षणी बोलले जातेय, हे मैत्रीत लक्षाय घ्या !"

November 6

काल गणेश दिघे या आपल्या मित्राचा ‘ मेघदूत ‘ हा बॅले बालगंधर्व रंगमंदिरात बसून ऐकला आणि मराठी रंगभूमीदिन ( ०५ नोव्हेंबर ) साजरा होण्यात सामील झालो. हा जर ठरल्याप्रमाणे प्रयोगरूपात सादर झाला असता तर नक्कीच काही भव्य घडले असते, यात शंका नाही. कळलेल्या माहितीप्रमाणे विश्वासघात, शत्रुत्व, आणि मराठी माणसचे आवडते तथाकथित मतभेद यांमुळे अनेकांची मेहनत आणि निर्मात्याचे ( म्हणजे गणेशचेच ) पैसे बऱ्याच प्रमाणा
त वाया गेले. एवढी मोठी आणि वेगळी गोष्ट मराठीत घडत असताना ( ‘ मेघदूत ‘ चा बॅले करून तो रंगभूमीवर सादर करावा असे ‘ दिसणे ‘ आणि त्यासाठी जिवाचे रान आणि पैशाचा चुराडा करायला तयार होणे, हे अद्वितीय आहे ! ) सर्वांनीच धीराने आणि समंजसपणाने हे घडवायला हवे होते, असे वाटले. पण ते काहीही असले तरी गणेशच्या जिद्दीला सलामच केला पाहिजे ! लौकरच हा प्रयोग आवश्यक त्या भव्यतेने साजरा करणारच, हे गणेशने जाहीर केले आहे. हा प्रयोग अंध व्यक्तींसाठी विनामूल्यच नव्हे तर त्यांना सन्मानाने निमंत्रण देऊन ठेवण्यात आला होता. ते सर्व ' मेघदूत ' ऐकताना त्या अंध प्रेक्षकांची जी दाद येत होती ती पाहून, हे किती ग्रेट ‘ प्रेक्षक ‘ आहेत, या जाणिवेने ऊर भरून आला. गणेशला ‘ मेघदूत ‘ शिकवणाऱ्या प्रा. चिपळूणकर जाहिरात बघून आल्या होत्या. गणेशने त्यांना अभिवादन करून त्यांचा तर सत्कार केलाच, शिवाय त्यांच्या हस्ते दोन अंध शिक्षकांचाही सत्कार केला. खेद, दुःख, आनंद यांच्या मिश्र मनःस्थितीत कालची संध्याकाळ गेली. शिवाय इतक्या तीव्र प्रेमाने बद्ध असणाऱ्या यक्ष-यक्षिणीना, त्या प्रेमाची शिक्षा म्हणूनच जणू, विरहाचा शाप देणारे कुबेरासारखे आपले तथाकथित देव किती गधडे आणि भयानक होते, हे सतत जाणवत होते, ते वेगळेच ! गणेशचे त्याच्या या स्वप्नाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन आणि लौकरच त्याला हा बॅले त्याच्या इच्छेप्रमाणे उभा करता येवो, ही शुभेच्छा !!!

November 3

"काहीही कसेही घडले तरी माणसे आपले मत, भूमिका सोडत वा बदलत नाहीत, असे दिसते -- याच पार्श्वभूमीवर माणसे मते, भूमिका बदलतानाही दिसतात -- या दोन्ही गोष्टी कशामुळे घडत असतील ?"

November 2

"रस्त्यावरचा गुंड, राजकीय पुढारी, धर्माभिमानी, विचारसरणीनिष्ठ आणि अभ्यासू बुद्धिवादी – या सगळ्यांचे पायाभूत सांगणे एकच असते – “ माझ्याविरुद्ध बोलायचे नाही ! “ आणि हे सगळेच आपापल्या टोळ्या करून राहतात."

October 2012

October 31

सकाळीच कामानिमित्त बाहेर गेलो होतो. कॉर्पोरेशनचे दोन कर्मचारी कसलेतरी भित्तिपत्रक चिकटवत होते. म्हटले, " काय, कसला नवीन नियम काढलाय ? " त्यांतला एकजण म्हणाला, " नियम नाही हो -- लोकांच्याच फायद्याचं आहे -- " मी म्हणालो, " तुम्ही असं काही लावताना दिसला की मला वाटतं, कसलेतरी पैसे भरायचं काम असणार -- नाही भरले तर दंड किती, तुरुंवास किती, ते असणार -- " दोघेही हसले. " नाही हो -- हे डेंग्यू पसरू नये म्हणून घ्यायच्या काळजीचं आहे -- " मी म्हणालो, " लोकांना आता एक वेळ डेंग्यू चालेल, पण पैसे भरायचं काही काढू नका -- " दोघेही हसले. " बघा की वाचून -- " म्हणाले. मग त्यांनी लोक कसे ऐकत नाहीत वगैरे सांगितले. सारांश हा, की भारताचा एक नागरीक भारताच्याच दुसऱ्या दोन नागरिकांशी हसतखेळत, गंमतीत बोलतोय, असे एक विलोभनीय दृश्य मी आज पुणे शहरात घडवून आणू शकलो !

October 26

मिडनाईट इंटरल्यूड

ओंकार कुलकर्णी आणि नेहा जोशी यांची ही शॉर्ट फिल्म काल पाहिली. शहरात एकटा राहणारा तरुण आयटी तज्ञ आणि त्याची एक मध्यरात्र – असा विषय. मनोव्यापारांचे तंत्र या पद्धतीने त्याचा हा जीवनतुकडा त्याच्या एकूण जगण्याचाच वेध

घेतो. एकच खोली, बियरच्या बाटल्या खाली पाडून फोडणारे उंदीर, नळाला पाणी नसणे, संडासात गाणे म्हणावे तरी शेजाऱ्याला त्रास, दुरावलेली प्रेयसी, संवाद नसणे, एकाकीपणा – हा स

गळा नमूना आपल्यापुढे आधुनिक झगमगीतपणाचा फील देत सादर होतो. प्रत्येक गोष्ट अशी खरेच घडली का, हा प्रश्न नाही. त्याने हाताची नस कापून घेणे हे मनात साठत चाललेल्या हिंसेचेही सूचन करते. अशा जगण्याची हीच होणार परिणती – असे वाक्य आपल्या डोक्यात येतानाच – आपलेही असेच क्रियाप्रतिक्रियांचेच आयुष्य ताबाहीन चाललेले नाही का – हा प्रश्न आपल्या डोक्यात येतो. आजच्या जगण्याचे दर्शन घडवत काही मूलभूत प्रश्न ही फिल्म समोर आणते, हे महत्त्वाचे आहे. मधेच " इतिहास शिका, इतिहासातून शहाणपण येते " अशा अर्थाच्या काही वाक्यांचे आवर्तन आहे. ते तर अनुभवातून शिकण्याच्या कल्पनेचीच खिल्ली उडवणारे आहे ! याच संदर्भात, त्याची पुस्तके जाळण्याची कृतीही बरेच सांगून जाते. जमल्यास जरूर पाहा ही फिल्म. थोडक्या वेळात उत्तम, अर्थपूर्ण अभिव्यक्ती !

October 25

"माणसाच्या समूहजीवनातले आणि सगळ्याच संबंधांतले, विषमता, अपमान, छळ असे आजार आणि त्याच्या शरीराचेही ८० % आजार हे त्याच्या मन वापरण्याच्या सध्याच्या सर्वमान्य पद्धतीतून उगम पावतात, हे स्पष्टच आहे. हे हजारो वर्षे चाललेले असूनही, मन वापरण्याची अशी विध्वंसक नसलेली अशी काही पद्धत असू शकेल का, हा प्रश्नही विचारायला माणूस तयार होत नाही !"

October 21

जुईची कविता – ' श्वासाचं बांधकाम '.

जुई कुलकर्णी हिची कविता तिच्या स्वतःच्या नावाप्रमाणेच मिताक्षरी आहे. साधीही आहे. विचार-भावनांना ती सरळ, सहज अभिव्यक्ती देते. जगण्यातली क्रियाशीलता हेच या कवितेचे मुख्य अंगद्रव्य आहे. विशेष म्हणजे जुई स्वतः चित्रकार असूनही तिची कविता खूप चित्रमय वा प्रतिमामय आहे, असे म्हणता येत नाही. नव्या कवींच्या कवितेबाबत केली जाणारी दुर्बोधतेची तक्रार जुईच्या कवितेबद्दल फारशी करता येणार नाही. तरीही ही आजचीच कविता आहे. मुख्यतः आजच्या जगण्यातला उन्मुक्तपणा, काहीसा तात्पुरतेपणा, त्यातून येणारी भावनिकतेतली घट आणि जे असेल जगणे ते आहे तसे घेण्याची तयारी आणि अकांडतांडवाची निरर्थकता समजून असणे – हे सगळे आजच्या जगण्याचे विशेष म्हणता येतात. जुइच्या कवितेचे – एका अर्थाने तिच्या जगण्याचेही – विश्व फार मोठे नाही. आधुनिक जगण्यातलेही सांगणकीय वा बाजारपेठीय असे संदर्भ तिच्या कवितेत फारसे नाहीतच. या अशा आपल्या व्यक्तिमत्वातून ही कविता एक दाखवूनच देते की

जगण्याच्या प्रक्रियेला भिडण्यासाठी अंगद्रव्याची श्रीमंती लागते, असे मुळीच नाही. जुईची कविता ही आजच्या स्त्रीची कविता आहे. अभिव्यक्तीतला निर्भयपणा आणि बेधडकपणाही, ही गोष्ट अधोरेखित करतो. ही मानवी जगण्याची कविता आहे. जगण्यातले प्राथमिक प्रश्न मिटल्यावरही त्यात खूप सुखदुःखांचे पदर राहतात, मानवी प्रश्न राहतात – त्यांची ही कविता आहे. संवेदनशीलतेमुळे जुई अनुभवातल्या सूक्ष्मतेचा सहज वेध घेते. शब्दांचा क्रम, त्या विशिष्ट क्रमामुळे उमटणारी अर्थवलये आणि अचानक जणू वाक्य पूर्ण करत असल्यासारखा येणारा एखादा अनपेक्षित शब्द – हे जुईचे तंत्रकौशल्यही वेगळे आणि दाद द्यावे असे आहे. यातल्या सगळ्याच कविता उत्कृष्ट आहेत वा जुईची सगळी कुवत व्यक्त करणाऱ्या आहेत, असे नाही, पण कवितासंग्रहाची मूल्यात्मकता ही शेवटी एक उंची गाठणाऱ्या कवितांवरच केली पाहिजे. खूप सविस्तर लिहिण्याची ही जागा नव्हे, पण वाचता वाचता मला आवडलेल्या काही कविता सांगतो – बहावा ( पृ ७ ), सत्यदर्शन ( पृ ३९ ) आणि प्रश्न ( पृ ९० ) . आणखीही बऱ्याच आहेत. सध्या अनुभवाचे बारकावे आणि रूप न्याहाळण्यात गढलेली ही कविता थोड्याच काळात जगण्यातले तात्त्विक स्वरूपाचे मूलभूत प्रश्न पाहू लागली तर आश्चर्य वाटू नये. तशा खुणा या संग्रहात दिसतात. जुईचे अभिनंदन आणि शुभेच्छा !

October 18

"लॅंग्वेजबार दिसेनासा झालाय, पण भाषाबदल सोपे झालेयत ! असे मेंदूत काय होऊ शकेल ? ( एक ट्रायल म्हणून निरर्थक काही टाकलेय -- फार विचार करू नये, ही विनंती ! ) Don't worry !"

October 17

अमिताभ बच्चन गुन्हेगारी विश्वात कार्यरत असणे फारच इंटरेस्टिंग ! तो का बाबा गुन्हेगार झाला, ते आपल्याला पटावे म्हणून त्याचे बालपण कसे वाईट गेले, कसे हाल झाले आणि त्याची गुन्हेगारी जगाकडे वाटचाल कशी अपरिहार्य होती, हे दाखवले जाते. आपल्याला वाईट वाटत पटते. पण हीच गोष्ट अमजदखान गुन्हेगार असतो तेव्हा केली जात नाही. त्याचा आपल्याला राग येणेच योग्य, असे एकूण दाखवले जाते. हस्तरेषा शास्त्राप्रमाणे, गदेसारखा अंगठा असणारे लोक अचानक संतापणारे आणि खुनशी प्रवृत्तीचे असतात, त्यांच्या हातून खूनही होऊ शकतो. आता एखाद्याचा अंगठा तसा होण्यात हजारो कारणे असतात. एकूणच माणूस हजारो वर्षांत उत्क्रांत होत आलेला असतो आणि प्रत्येक माणूसही हजारो कारणांनी घडत असतो. हवामान, अन्न, घर, नातेवाईक, जनुकीय प्रक्रिया, भाषा, जगात घडणाऱ्या लाखो गोष्टी या सगळ्यांचे प्रत्येक माणसावर परिणाम होत असतात. मागील काळापासून पुढील काळापर्यंत काय कशाचा परिणाम आहे, हे बौद्धिक विश्लेषणाने सांगणे महामूर्खपणाचे ठरावे, इतके हे सगळे, कारण-परिणाम साखळ्यांनी एकत्र बांधलेले दिसते. किरकोळ गोष्टीपासून मोठ्या गोष्टीपर्यंत सगळेच सतत एकमेकांवर परिणाम करत असल्याने, भारतातली मुंगी शिंकली तर

चीनमधल्या नदीला पूर येतो, हे विधान विनोदी नव्हे तर खरे वाटावे, असे दिसू लागते. आणि विश्वातली प्रत्येक गोष्ट, घटना ही इतर सगळ्या गोष्टी आणि घटना यांमुळे घडत असेल तर समोर दिसणारी वरवरची कारणे पाहून विश्लेषण करणे निरर्थक ठरते. आणि असे सगळे एकत्र असेल तर काही घडतच नाही, असे म्हणावे लागते, कारण या सगळ्याच्या बाहेरून, कुठून, कोण म्हणणार की अमुक घडतेय ! ? हे पाहता, यामुळे असे झाले आणि त्यामुळे तसे झाले असे इतिहास समजावून देणारे बौद्धिक अन्वय फारच उथळ ठरू शकतात. पण मग मानवी जगत चालवावे कसे ? त्यासाठी, शिक्षा, बक्षीस, युद्ध, विनाश आणि डोकी भरकटून वेडे होणेही अटळ ठरते. – मुळात हे असे आहे का आणि याबद्दल कुणाला काय वाटते ?

October 15

"भूमिका ही विचारपूर्वक, कष्टपूर्वक घडवलेली, स्वीकारलेली मानसिक अवस्था -- एक पवित्रा, पोझ -- असते. हा एक ताण असतो. ताण दुःखमय असतो, हे सांगायला मानसशास्त्रज्ञाची गरज नाही. या अर्थाने, सगळे भूमिकावाले दुःखाचे पुरस्कर्ते आणि दुःखी असतात. ते स्वतःच्या किंवा कुणाच्याही आयुष्यात शांततेचा -- आनंदाचा क्षण आणू शकत नाहीत."

October 6

"आणि हे चाललेय कुठे ? देवीच्या देवळात ! देवीचे चार दिवस देऊळ बंद ठेवले तर उत्पन्न बुडेल, त्यामुळे, तिच्या त्या चार दिवसांत देवी अपवित्र नाही होत !"

October 4

"देव, अवतार, संत आणि सामान्य माणूस -- ही उतरती भाजणी आहे का ? -- हा प्रश्न फक्त हे चारही मानणाऱ्यांसाठीच आहे, असे नाही -- यातले काहीही मान्य नसलेल्यांनीही यावर बोलावे --"

October 3

Chandrakant shared a link.

Ednexa | Next Generation Education for MHT-CET / AIEEE

www.ednexa.com

"माझी मुलगी सौ. अंजली पारखी हिचे, ११ वी इलेक्ट्रॉनिक्स च्या विद्यार्थ्यांसाठी एक प्रेझेंटेशन लेक्चर ( एक तास ) www.ednexa.com या साईटवर आज रात्री ०८-०० वाजता होणार आहे. संबंधितांनी जरूर ऐकावे / संबंधितांना सांगावे. आधी तिथे फ्री रेजिस्ट्रेशन अकौंट ओपन करावे लागते."

October 2

"आपले वागणे ठरण्यासाठी मनाशिवाय दुसरा स्रोत नाही, असे असल्यावर, खरे, खोटे, प्रामाणिक, अप्रामाणिक, निष्ठावान, व्यभिचारी, सांस्कृतिक, असांस्कृतिक, सभ्य, असभ्य -- हे सगळे गुण-अवगुण जगण्यात असणार -- या ना त्या नात्यात -- या ना त्या क्षेत्रात. या गोंधळातून मार्ग काढत, आपल्या अपेक्षेप्रमाणे आपले जगणे घडवण्याचा प्रयत्न करणेही त्यातच आले. एका व्यक्तीला जे बरोबर वाटते तेच तसेच बरोबर वाटणारी दुसरी व्यक्ती असू शकत नाही. शक्य तो यातून सावरत चालणे, हे सर्वांनाच करावे लागते. एकाला वा अनेकांना मान्य असलेली कोणतीच पद्धत एकाच्या वा कुणाच्याही जगण्यात असू शकत नाही. मन द्वंद्वात्मकच असणार -- त्यासहच जगावे लागणार. एक सर्वमान्य पद्धत अशक्य."

September 2012

September 29

"सुमारे पाचेक वर्षांत गणपती उत्सवाची इतकी प्रगती होईल की आवाजाचे पूर्ण समाधान मिळण्याची पर्यायी व्यवस्था म्हणून लोक दगडांनी एकमेकांच्या कवट्या फोडतील !"

September 22

मानवी संबंध हे -- प्रत्यक्ष दर्शन, अंदाज, कल्पना, तर्क, बुद्धी या मनाच्या आकलनमर्यादेत घडतात, फुलतात, बिघडतात वा बरबाद होतात. उदाहरणासाठी आपण जोडीदार / प्रियकर / प्रेयसी या संबंधाबाबत बोलू. आता संबंधित व्यक्ती चोवीस तास तुमच्या समोर असू शकत नाही. स्थलकालात ती अनेकदा लांब असते. मनाला असणाऱ्या स्थलकालाच्या मर्यादांमुळे त्याला सगळीकडचे ‘ सत्य ‘ तर दिसू शकत नाही. त्यामुळे संबंध एक तर अंधसंशययुक्त वा अंधविश्वासयुक्त होतो. अंधसंशययुक्त संबंधात प्रचंड हाल आणि छळ अंतर्भूत असतात. म्हणून, त्यापेक्षा, अंधविश्वासयुक्त संबंध बरा, असे म्हणावे काय ? की आधुनिक जीवनशैलीत विश्वास, प्रतारणा, निष्ठा यांना स्थानच राहिलेले नाही, असे म्हणावे ? संशयग्रस्त व्यक्तीला मानसिक रोगी समजून तीवर उपचार करायची सोय आहे, पण या रोगाला बळी पडणे मनाला अनेकदा भागच पडते, याकडे लक्ष द्यायला आपण का तयार नसतो ? की मनाला उपलब्ध असणाऱ्या साधनांवर संबंध आधारित असणे, हेच निरर्थक समजावे ? असे, यातून समोर येणारे प्रश्न पाहायला आपण नकार का देतो ? त्यापेक्षा विध्वंस होणे / करणे हे आपल्याला अधिक सोयीस्कर का वाटते ? एकमेकांचा छळ न करता जगण्याची काही पद्धत असूच शकत नाही का ? असे

काही ना काही गृहीत धरून अंध जगणे, याला माणसाचे भागधेय म्हणावे का ? म्हणजे, बरोबर, नैतिक, श्रेयस असे शब्द टाकून देणेच शहाणपणाचे होईल का ? मग जगण्यातली ' सर्जकता ' म्हणजे काय ?

September 5

निरोप – पुरवणी

कालच्या माझ्या ‘ निरोपा ‘ नंतर बऱ्याच फ्रेंडसची मते-सूचना मिळाल्या. त्या लक्षात घेऊन ही पुरवणी --

१. फेसबुक खाते बंद करणार नाही. ते चालू ठेवण्यासाठी असलेले नियम पाळले जातील.

२. येणाऱ्या मेसेजेसना उत्तरे दिली जातील.

३. फ्रेंडस संख्येवर या ‘ निरोपा ‘ चा काहीच परिणाम होणार नाही.

४. थोडक्यात म्हणजे स्टेटस, कॉमेंटस या मोठ्या एरियातली उपस्थिती बंद होईल.

५. आपल्या फ्रेंडसना हे सांगायलाच हवे – असे काही दिसल्यास / सुचल्यास त्याचे स्टेटस दिले जाईल.

६. माझ्या एकूण नोटस, स्टेटस व कॉमेंटस हे सगळे एका बाजूला सेव्ह करण्याचे काम केले जाईल.

धन्यवाद, सर्व फ्रेंडस !

September 3

निरोप

फ्रेंडस, २०१० पासून मी इथे फेसबुकवर आहे. सध्या सुमारे १२०० पर्यंत फ्रेंडस आहेत. तुम्हा सर्वांच्या सान्निध्यात आणि तुमच्याबरोबरच्या गप्पाटप्पा, चर्चा, टवाळ्या, छेडछाड, थोडा चावटपणाही, या सगळ्यांत हा काळ समृद्ध झाला यात शंकाच नाही. तरीही, माझ्या हातून कुणाचा अपमान होणे, कुणाला दुखवले जाणे, कुणाकडे दुर्लक्ष होणे – अशा चुका व प्रमाद घडले असणारच. पण तुम्ही सर्वांनी उदार अंतःकरणाने मला माफ केले आहे, हे स्पष्टच आहे. याबद्दल अर्थातच मी ऋणी आहे. या माध्यमाचा एक अत्यंत समृद्ध अनुभव तुम्हा सर्वांमुळे मला मिळाला. खूप नोटस लिहिणे झाले, असंख्य कॉमेंटस दिल्या गेल्या. यातले बरेचसे, काही मासिकांनी आहे तसे छापलेही. अलीकडेच ‘ चव्हाटा ‘ या इथल्या ग्रुपमधल्या फ्रेंडसनी आस्थेने माझी एक मुलाखत घेतली आणि अशी संधी मिळणारा मराठीतला पहिला लेखक मी झालो. एकापेक्षा एक

भारी फ्रेंडस इथे मिळालेले आहेत. बाहेरच्या तथाकथित खऱ्या जगातही यांच्याशी इथल्यासारख्याच प्रेमाने भेटीगाठी होतील, गप्पा होतील, याची खात्री आहे.
माझे जे काही सदोष-निर्दोष आकलन असेल ते बऱ्याच विषयांच्या निमित्ताने इथे व्यक्त करत आलो. आता खूप नवीन काही बोलायचे राहिले आहे, असे वाटत नाही. आणखी एक बाब म्हणजे, बराच काळ माझे फारसे सर्जक लेखन चालू नव्हते. या नव्या माध्यमात, वेगळ्या प्रकारे, विशेषतः संक्षिप्त रूपात व्यक्त होण्याची मजा, या काळात मिळाली. आता मात्र लेखनाचे काही प्रोजेक्ट समोर असून ते बऱ्यापैकी वेळ आणि श्रम यांची मागणी करणारे आहेत.
या पार्श्वभूमीवर मी फेसबुकवरून आपणा सर्वांचा निरोप घेण्याचे ठरवले आहे.
व्यक्तिगत निरोप घेणे शक्य नाही, हे तुम्ही समजून घ्यालच.
या काळात मी काही फ्रेंडसना त्यांनी कविता वा इतर साहित्य पाठवल्यास वाचून प्रतिक्रिया देण्याचे आश्वासन दिलेले आहे. तसे कुणाला पाठवायचे असल्यास champrade@gmail.com हा माझा इमेल-आयडी आहे. आश्वासन पाळले जाईल.
हा नीट विचारपूर्वक घेतलेला निर्णय असल्याने याला आपणा सर्वांच्या शुभेच्छा लाभाव्यात, ही विनंती.
पुन्हा एकदा, चूकभूल माफ करावी, अशी विनंती करून ही निरोप-नोट संपवतो.

"प्रयत्नाने नव्हे तर सैल, मोकळे स्वतंत्र सोडल्याने मन शांत होते."

September 2

"लेखकाला आकलन, भान अत्यावश्यक पण तो वेडेपणातूनही गेलेला असावा लागतो."

"आपल्या बाजूचे आणि आपल्या विरुद्ध, आपल्याला आवडणारे आणि न आवडणारे, सरळ वाटणारे आणि डावपेचात्मक वाटणारे -- अशा तपशीलांचा विचार करत जाणे म्हणजे गर्तेत कोसळत जाणे ! बरेच तपशील काल्पनिकही असू शकतात ! तपशीलांना बळी न पडणे हिताचे !"

September 1

"मी जरा एक मुद्याला हात घालणारा प्रश्न विचारू इच्छितो. या माध्यमात थोडीफार छेडछाड, थोडा चावटपणा, थोडे द्व्यर्थी बोलणे ( कॉमेंटमध्ये आणि व्यक्तिगत चॅटिंगमध्ये ) होत असते. स्त्रियांनी यावर त्यांची मते व्यक्त करावी, असे वाटते. यात कोणत्या मर्यादा त्या अपेक्षितात, वगैरे. हा जाहीर चर्चेचा विषय नसेलही कदाचित पण सगळ्यांना माहिती हवी, असावी -- जरी या मर्यादा रोज आणि व्यक्तिगणिक बदलणाऱ्या असल्या तरीही !"

"मानवी संबंधांचे प्रश्ननिराकरण मनप्रांतात होऊ शकत नाही."

August 2012

August 31

"आपला विश्वासघात झाला आहे किंवा होतो आहे, अशा संशयाचा त्रास, आपला अहंकार टाकला गेला तरच जाऊ शकतो -- बाहेर दुरुस्त्या करून वा आपल्या अहंकाराची जुळवाजुळव करून नाही."

August 29

"मुळात आपल्याकडून आपल्यालाच न पटणाऱ्या कृती घडू शकतात, याला स्वतःशी झालेली बेइमानी म्हणणे भाग आहे आणि त्याची शिक्षा म्हणून मानसिक खरचटत राहणेही भाग आहे !"

August 28

"अतिरेकी दुःखाप्रमाणेच अतिरेकी सुखही
भीती वाढवणे आणि शरीर-मनाचा नाश करणे
हे दोन्ही एकत्रितपणे करते."

August 26

"माझ्या स्वभावाचा तुझ्या स्वभावाला त्रास नको ।
तुझ्या स्वभावाचा माझ्या स्वभावाला त्रास नको ।।
असे सगळ्यांनी एकमेकांना म्हणावे ।।।"

August 22

"फेसबुकचे काय बिघडले आहे ? बऱ्याच जणांच्या प्रत्येक शब्दानंतरच्या स्पेसमध्ये चौकोन का येतोय ?"

August 17

"जगातल्या १०,५०३ अशा वाईट गोष्टी मला माहीत आहेत की त्या नष्ट केल्या की जग सुंदर, सुखावह होणार आहे ! एक तर माझा हा आकडा कमीजास्त होतोय ( सगळ्याच बाबतींतल्या द्विधा मनःस्तितीमुळे ) आणि मुख्य म्हणजे माझे पूर्णपणे पटणारा / री एकही सापडत नाहीय ! कहर म्हणजे अशा अनेकांनी तयार केलेल्या याद्यांत खूप तफावती आहेत ! आणि बोलू नका कुठे, काही याद्यांत तर माझेही नाव आहे !!"

August 15

"मी एक संपूर्ण माणूस; सर्व माणसांचा मिळून बनलेला; माझी योग्यता सर्व माणसांच्या एकत्रित योग्यतेच्या बरोबरीची. आणि इतर कुठलाही माणूस माझ्याइतक्याच योग्यतेचा आहे; अशी माझी धारणा आहे.
-- जाँ पॉल सार्त्र -- ' शब्द ' या वा. द. दिवेकर यांनी अनुवाद केलेल्या पुस्तकाचा शेवट.
( मला हे खूप आवडल्याने सर्व फ्रेंडस पुढे ठेवले आहे. )"

August 13

"स्वतःला ओळखणे म्हणजे काय ? जगताना स्वतःला ओळखण्याचा उपयोग काय ? निर्भीडपणे ( आणि बऱ्याचदा छुप्या समर्थनाच्या इच्छेनेही ) स्वतःच्या अनेक वैशिष्ट्यांचे वर्णन करता येणे, यालाच, स्वतःला ओळखणे म्हणावे का ?"

August 10

"एखादा दिवस चांगला गेला, असे वाटते -- एखादा वाईट गेला, असे वाटते -- याला प्लसमायनस म्हणू. तसेच फेसबुकचेही असते दर दिवसाचे प्लसमायनस. दोन्हींचे परिणाम सेम ! पण फेसबुकला आपण आभासी जग म्हणतो ! हे सगळे पाहता ' खरे ' जग आणि ' आभासी ' जग यांत फरक कोणता ?"

August 5

"' शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला ' हे नाटक आज पाहिले.अप्रतिम !!! असा प्रयोग वारंवार पाहायला मिळत नाही. नाववाल्या कलाकारांनी तोंडात बोटे घालून पाहावा असा अभिनय ! नंदू माधवांचे दिग्दर्शन लाजवाब ! राजकुमार तांगडे यांचे लेखनही अभ्यासपूर्ण आणि शिवाय आवश्यक ती मजा आणणारे ! मस्ट सी, असे नाटक !"

August 4

"समाजमान्य नैतिक, कायदेपाळू, सभ्य, निरुपद्रवी -- असे जगायला कोणतेच मन तयार नसते -- त्याला दडपून त्या साच्यात बसवावे लागते -- पण त्या साच्यात मन न बसवणाऱ्याला सगळेच हलकट, नीच म्हणतात !"

August 3

Chandrakant wrote on Usha Prabhune's timeline.

"आता फेसबुकवर दिलेले पाहा. दोन वेगवेगळ्या ठिकाणी दिले आहे -- एक नेहमीच्या जनरल ठिकाणी आणि दुसरे ' चव्हाटा ' या ग्रुपमधे ! दोन्ही मिळून, आत्तापर्यंत सुमारे २०० लोकांनी पाहिले आहे. सरांना दाखवा."

Chandrakant shared a link.

Welcome to the Internet Home of the Prabhunes!!

prabhune.com

‘ अक्षरवाङ्मय ‘ हे मराठीत अलिकडेच आलेले एक साहित्यिक त्रैमासिक असून अल्पावधीतच ते साहित्य-वर्तुळात प्रतिष्ठा पावत आहे. या त्रैमासिकाचा जुलै-डिसेंबर ‘ १२ हा जोड अंक ‘ प्रायोगिक नाटक : भारतीय आणि जागतिक ‘ या विषयावरचा विशेषांक असणार आहे. याचे अतिथी संपादक डॉ. अरुण प्रभुणे हे मराठी नाटकाचे अभ्यासक असून त्यांचा मराठी पौराणिक नाटकावरचा शोधप्रबंध अनेक अभ्यासकांना उपयुक्त वाटत आलेला आहे. सध्या ते अमेरिकेत असून तिथल्या स्टॅनफोर्ड विद्यापीठात ते व्हिजिटिंग स्कॉलर आहेत. सध्या ते महाराष्ट्रीयन व अमेरिकन लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास करत आहेत. त्यांच्या विचक्षण कल्पनेतून हा अंक आकाराला येतो आहे. यात भारतातले तसेच जगातलेही अनेक रंगकर्मी योगदान देत आहेत. फेसबुकवरच्या सर्व फ्रेंडसच्या माहितीसाठी या त्रैमासिकाची माहिती आणि य विशेषांकाची श्रेयनामावली पुढे देत आहे. हे पाहताच एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येईल की अशा प्रकारचा, जगभरातील व्यक्तींच्या

सहकार्यासह, एखाद्या विषयाचा आवाका घेण्याचा हा मराठीतला पहिलाच पण जंगी प्रयत्न आहे. हा एक संदर्भमूल्य असलेला अंक असणार आहे. ( या अंकात माझाही एक लेख असल्याचे श्रेयनामावलीवरून फ्रेंडसच्या लक्षात येईलच. )

'अक्षर वाङ्मय' नाट्य-विशेषांक जुलै – डिसेंबर २०१२

'प्रायोगिक नाटक : भारतीय आणि जागतिक'

भारतीय, अमेरिकन,ब्रिटिश, स्पॅनिश,जपानी,आणि नायजेरियन रंगभूमीसंदर्भातील
८ खास मुलाखती आणि ४ खंडांतील मान्यवरांचे १८ लेख

मराठी आणि इंग्रजी भाषेतील दर्जेदार लेख प्रसिध्द करणारे 'अक्षर वाङ्मय' हे वाङ्मयीन नियतकालिक असून ते त्रैमासिक आहे.

जुलै – डिसेंबर २०१२ चा 'अक्षर वाङ्मय' नाट्य विशेषांक हा जोडअंक असून तो 'प्रायोगिक नाटक : भारतीय आणि जागतिक' या विषयावर आधारलेला असेल.

भारतातील आणि अन्य देशांतील प्रख्यात नाटककार, दिग्दर्शक, नाट्यसमीक्षक यांनी खास 'अक्षर वाङ्मय' नाट्य विशेषांकासाठी लेख लिहिलेले आहेत व मुलाखती दिलेल्या आहेत.

या नाट्य विशेषांकात ८ मुलाखती समाविष्ट आहेत:

- ४ विदेशी रंगकर्मींच्या मुलाखती
- ४ भारतीय रंगकर्मींच्या मुलाखती

या अंकातील इंग्रजी लेखांचा मराठीतून आणि मराठी लेखांचा इंग्रजीतून थोडक्यात सारांश दिलेला असेल.

'अक्षर वाङ्मय'चा हा नाट्यविशेषांक साधारण ३५० पृष्ठांचा असेल.

'अक्षर वाङ्मय'चे वार्षिक सभासदशुल्क:

- भारतासाठी: ५०० रुपये (टपाल खर्चासह घरपोच)

• विदेशासाठी: ५० अमेरिकन डॉलर्स (टपाल खर्चासह घरपोच)

‘अक्षर वाङ्मय’चे सभासद लवकर झाल्यास वार्षिक वर्गणीतच नाट्य विशेषांक मिळू शकेल.

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, स्टेट बँक ऑफ इंडिया, अहमदपूर, जिल्हा लातूर या नावे आपण ५०० रुपयांचा ड्राफ्ट पाठवू शकता. चेक स्वीकारला जाणार नाही.

ड्राफ्ट पाठविण्याचा पत्ता: डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, ‘प्रणव,’ रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३ ५१५, जिल्हा लातूर.

आपल्या वर्गणीची रक्कम आपण स्टेट बँक ऑफ इंडिया, अहमदपूरच्या शाखेत इ-ट्रान्सफर करू शकता:
• ब्रँच नंबर: ४३६९
• अकाउंट नंबर: ३१७५२२१७९०६

‘अक्षर वाङ्मय’चे अंक वेबसाईटवर उपलब्ध आहेत.
‘www.prabhune.com’ही वेब साईट ओपन झाल्यावर ‘Arun’वर क्लिक करा. अंक दिसू लागतील.

‘अक्षर वाङ्मय’चे संपादक व प्रकाशक नाट्य विशेषांकाचे अतिथी संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी डॉ. अरुण प्रभुणे, सॅन होजे, अमेरिका
इ-मेल: suryawanshinanasaheb67@gmail.com इ-मेल:arun_prabhune@yahoo.co.in
फोन: ९४२३६५५८४१ (मोबाईल) फोन: ००१-४०८-५३२-१६८३

श्रेय नामावली

भारतातील मान्यवर विदेशांतील मान्यवर

१) देवेंद्र राज अंकुर 17) Dr. Elaine Aston, U.K.
माजी संचालक, Professor of ContemporaryPerformance,
नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा,दिल्ली. Writer,Drama Critic, and Senior Editor of

नाटककार,दिग्दर्शक,अभिनेता, नाट्यसमीक्षक. TheatreResearch International.

२) विजया मेहता 18) Dr. Farley P. Richmond, U.S.A.
दिग्दर्शक, अभिनेत्री. Professor of Theater, Director, Author, and
Drama Critic.

३) अमोल पालेकर 19) Dr. Sharon G. Feldman, U.S.A.
दिग्दर्शक, अभिनेता. Professor of Spanish and CatalanStudies, and
Drama Critic.

४) सुलभा देशपांडे (मुलाखत) 20) Kimberly Jannarone, U.S.A.
अभिनेत्री, दिग्दर्शक. Doctor of Fine Arts, Professor of Theatre,
Author,Drama Critic, Actor,and Director.

५) सुनील शानबाग 21) Dr. Juliana Okoh, Nigeria.
दिग्दर्शक, अभिनेता, Professor of Theatre Arts, Playwright, Literary
पटकथाकार, माहितीपटनिर्माता. Critic,Educator, and Social Activist.

६) प्रतिमा कुलकर्णी (मुलाखत) 22) Kathy A. Perkins, U.S.A.
दिग्दर्शक, अभिनेत्री, लेखिका. Professor of Theater, LightingDesigner, and
Editor of Books.

७) विजय केंकरे 23) Antero Alli, U.S.A. (Interview)
दिग्दर्शक, अभिनेता. Founder of Para Theatrical Research Centre,
Actor,Director, and Writer.

८) रामदास भटकळ 24) Yuriko Doi, U.S.A. (Interview)
प्रकाशक, पॉपुलर प्रकाशन. Founder of Theater of Yugen, Actor,and
Director.

९) अच्युत वझे (मुलाखत) 25) Paige Rogers, U.S.A. (Interview)
नाटककार, दिग्दर्शक. Associate Artistic Director and Cofounder of The Cutting Ball Theatre.

१०) चंद्रकांत प्रभाकर देशपांडे 26) Kenny Perkins, U.S.A. (Interview)
नाटककार. Well-Known Native American Drummer and Performer.

११) अरुण काकडे (मुलाखत)
'आविष्कार' नाट्यसंस्थेचे संस्थापक सदस्य, अध्यक्ष.

१२) गीतांजली कुलकर्णी
अभिनेत्री.

१३) प्रभाकर भावे
प्रसिध्द रंगभूषाकार.
१४) डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे
हिंदी नाट्यसमीक्षक.
१५) डी. एस्. चौगले
कन्नड नाटककार, नाट्यसमीक्षक, अनुवादक.

१६) डॉ. संपदा कुलकर्णी
नाट्याभ्यासक, दिग्दर्शक.

July 2012

July 31

"आपल्या एफबीवरच्या असलेल्या मैत्रिणी कमी होऊ नयेत या सदहेतूने मी इथे फारशी चावट स्टेटस देत नाही."

July 29

"समोरची व्यक्ती दाताच्या कण्या करून आपल्याला पटवायच्या प्रयत्नात की तुमचा गैरसमज झालाय आणि आपल्याला ते मुळीच पटत नाहीय !"

July 27

"( पुरुषांसाठी अथवा उलट करून स्त्रियांसाठी -- ) बहुसंख्य स्त्रिया आकर्षक असतात, याला आनंद म्हणावे की प्रॉब्लेम ?"

"जर काहीच परिपूर्ण नाही, सगळेच संघर्षमय आहे, तर मतभेद कितपत अर्थपूर्ण मानावे ?"

July 25

"आजपासून अचानक उर्दूत लिहिलेल्या बऱ्याच पोस्ट येऊ लागल्या आहेत -- मला तर ते काही कळत नाही -- तशा पोस्ट आपल्याला नको असतील तर काय करावे ?"

July 24

"अनुभवांची संख्या आणि वैविध्य वाढवणे किंवा त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे जगणे समजून घेण्याचा शोध नव्हे. ( विजय तेंडुलकरांपासून बरेच लेखक ' शोध घेणे ' या विषयावर बोलताना दिसतात. त्याचा आपल्या परीने छडा लावावा, म्हणून ही पोस्ट. )"

July 18

"बास झाले आता स्टेटस देणे, असे माझ्यापुरते मनात आले -- आणि तेच स्टेटस देतोय !"

July 17

"कलेत काहीही त्याज्य वा वर्ज्य नाही, असे म्हणणाऱ्यांनीच ' आनंद ' हा शब्दही जणू जगण्यातूनच हद्दपार करावा, याला काय म्हणावे ?"

July 13

"कुणाचा फोटो, कुणी काढलाय, एफबीवर देणारा कोण, त्याचा हेतू काय -- ही काहीच माहिती न देता, इथे एफबीवर अनेक सुंदर तरुणींचे वा स्त्रियांचे ( त्यांच्या अनुमतीने ? ) फोटो दिले जातात. काय असतो हा प्रकार ?"

"बुद्धीने / विचारांनी पिरगाळलेल्या / मुरगाळलेल्या तणावग्रस्त मानसिक अवस्थेला जगणे समजण्याची अवस्था मानणे हा तर शोकपर्यवसायी निराशावाद !"

July 10

"“Convictions are more dangerous foes of truth than lies.”
— Friedrich Nietzsche
अस्तित्ववाद आणि ठोस मते हे विषय सध्या आपल्या समोर आहेत -- म्हणून, असू दे --"

July 9

"माणसे नसतातच, त्यांच्या प्रतिमा फक्त असतात."

July 8

"चलो अब जरा ( रूमानी म्हणजे रोमँटिक का ? ) लाईट हो जाय !"

' मन्वंतर ' ( समूहाकडून स्वतःकडे ) – लेखक – सुरेश द्वादशीवार ( साधना प्रकाशन ).
नुकतेच हे एक अद्वितीय पुस्तक वाचले. एकूणच माणसाच्या यापुढच्या जगण्याचा आवाका घेण्याचा असा प्रयत्न मराठीत आणखी कुठे झाल्याचे पाहण्यात / ऐकण्यात नाही. खूप मोठ्या सांस्कृतिक, वैचारिक बदलांची अपेक्षा साधार मांडणारे हे पुस्तक, ज्यांना कुणाला असे वैचारिक वाचन चालते, त्या सर्वांनी वाचावे असे आहे. नव्या प्रश्नांची शक्यता मान्य करूनही, आजपर्यंत आपण महत्त्वाचे समजलेले प्रश्न कसे भविष्यात संपुष्टात येणार आहेत, याचे अत्यंत मनोहारी चित्र या पुस्तकात आहे. अतिशय घट्ट वैचारिक / तार्किक बांधणी असूनही अत्यंत स्वप्नील / खुळे म्हणावे असे हे विवेचन आहे. जणू आता इथे स्वर्गच अवतरणार आहे, अशी ( मुळीच न पटणारी ) अचाट कल्पना, बुद्धीच्या अत्यंत कार्यक्षम वापरानेही कशी शक्य होते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. तरीही, कोणत्या ना कोणत्या सामूहिक अधिपत्याखाली जगत राहण्याचा काळ कसा संपत आला आहे, याची या पुस्तकातली मांडणी दाद द्यावी अशीच आहे. माणसाच्या मनाची विदीर्णतेची सवय – हा एक मुद्दा वगळल्यामुळे सगळी बौद्धिक कसरत कशी भ्रामक ठरते, हे इथे पाहण्यासारखे आहे. पण, छान वाटावे, रंगून जावे असे वैचारिक स्वप्न आपल्यासमोर ठेवण्याचे अवघड काम या पुस्तकाने केलेले आहे, यासाठी सदर लेखकाचे अभिनंदन करणे उचित होईल.

July 7

"ठोस बोलणे."

"माझ्या कॉमेंटस जात नाहीयत -- हे कशामुळे होत असेल ?"

July 6

"वय न सांगणे ( लपवणे ), ते कमी असल्याचा आभास तयार करणे, ते कमी असल्याच्या गैरसमजाला वाव ठेवणे वा मुद्दाम तसा प्रयत्न करणे -- हे सगळे, विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत, नैसर्गिक आहे की न्यूनगंडनिदर्शक आहे ? स्त्री-पुरुष समानतेला हे कितपत पोषक आहे ? की हानीकारकच आहे ?"

"विश्वाची उत्पत्ती ? ज्याच्यातून झाली असेल ते कुठून आले ? त्याची उत्पत्ती कशी झाली -- हे कधीही न संपणारे शोधकार्य आहे, त्याला शेवट नाही म्हणजेच अंतिम उत्तर नाही. ' काहीच नसणे ' गृहीत धरले तरच ' विश्वाची उत्पत्ती ' हा विषय येऊ शकतो. पण मग ' काहीच नसण्या ' तून ' काहीतरी ' निर्माण होणे हे अतार्किक नाही ठरत ? तज्ज्ञांनी यावर प्रकाश टाकावा."

July 5

"कुठलीही व्यक्ती स्वतःच्या दृष्टीने चांगली, न्याय्य, समर्थनीय असली तरीही दुसऱ्या व्यक्तीच्या वा व्यक्तींच्या दृष्टीने वाईट, ढोंगी, बनेल आणि हलकट असू शकते. या दोन्हीला काही अर्थ नाही, असे म्हणावे की फक्त दुसऱ्यांच्या मतांना अर्थ आहे, असे म्हणावे ? शेवटी दुसऱ्यांची मते प्रभावी ठरताना दिसतात."

July 3

"माझे नाटककार मित्र दिलीप जगताप यांनी त्यांच्या घरी प्रा. राम बापटांच्या उपस्थितीत माझ्या ' इराक ' या नाटकाच्या वाचनाचा योग जुळवून आणला होता. त्यांना ते आवडले होते. त्या निमित्ताने त्यांचे विचारही ऐकायला मिळाले होते. आणखी एका नाटककार मित्राच्या घरी त्याच्या नाट्यवाचनाच्या निमित्ताने प्रा. बापटाबरोबर चर्चा करण्याचा योग आला होता. अत्यंत साधे, अनाक्रमक पण स्पष्ट व्यक्तिमत्व अशा स्वरूपात ते माझ्या लक्षात राहिले. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !"

July 2

"विद्वत्तेशिवाय आकलन शक्य असते की नसते ?"

June 2012

June 29

"रममाण !!!"

June 28

"स्त्री-पुरुषांतील मैत्री ही लिंगभानाशिवाय असू शकते का, या प्रश्नाच्या संदर्भात ' निखळ मैत्री ' म्हणजे काय ?"

June 26

"एक जरा विचित्र स्पर्धा नव्हे, संमेलन म्हणू, घ्यावे असे मनात आले -- बघा कसे वाटतेय -- प्रत्येक फ्रेंडने किमान एक ' निरर्थक ' -- लक्षात घ्या -- निरर्थक -- वाक्य इथे द्यायचे -- अट एकच -- ते वाक्य निरर्थक असले पाहिजे आणि मुख्य म्हणजे त्या वाक्याचा काहीही अर्थ लागता कामा नये !"

June 25

"स्वतःच्या आयुष्यातल्या एखाद्या घटनेला वा संबंधाला कुणीतरी दिलेली एखादी रूटीन प्रतिक्रिया इतर असंख्यांना प्रचंड अपील होणे आणि विशेष म्हणजे ' ग्रेट ' वाटणे -- यातून काय घडते ते तपासायला हवे."

June 24

"हे किरकोळ, ते महत्त्वाचे !"

June 22

हेमंत दिवटे

‘ अभिधानंतर ‘ चे संग्राह्य अंक ज्यंनी वाचले असतील त्यांना हेमंत दिवटे कोण हे सांगायची गरज नाही. त्या वेळी त्यांच्याबरोबर आपले इथले मित्र सचिन केतकरही होते. ( मराठीत अशा आशयघन अंकांची गरज नाही, हा भाग वेगळा ! ) तर सांगायचे हे आहे की अलिकडच्या या एका महत्त्वाच्या कवीचा नवा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे – ‘ या रूममध्ये आलं की लाईफ सुरू होतं... ‘ असे त्या पुस्तकाचे नाव आहे. त्यातल्या सहज दिसतील त्या ( at random ) काही ओळी माहितीसाठी देतोय –

पृष्ठ ३१ –

वॉलवरची श्रद्धांजली ना आपल्याला
फॉरवर्ड करता येते ना नष्ट
सायबर स्पेसभर जमा झालाय
किरकोळ जगण्याचा खाजगी इतिहास
जो चरबीसारखा जमलाय
आणि निसटता निसटत नाहीये
पृष्ठ ४९ –
मी एक महाकाय विद्युतदाहिनी ऑन करतो
तपतपती लालबुंद वाट पाहतो व्हायची
मग कन्व्हेअर बेल्टवर एकेका
धर्माला लाइनशीर आडवं करतो
बेल्ट चालू करतो
धर्म लेंडकासारखे दाहिनीत टपटपतात
मी एकेका धर्माला राख होताना पाहतो
ओंजळभर भरलेली सगळी ऍश
कुणाच्याही नकळत अंगाला फासतो
उरलेली गटारात टाकून देतो
छान आंघोळ करतो
लिबर्टी मिळवतो

-- हा एक निराशावादी नकार आहे की शोधाची शक्यता बाळगणारा उद्रेक आहे, हे समजून घेण्यासाठी अवश्य वाचावा ,असा हा कवितासंग्रह आहे.

"अत्यंत टोकाची अकल्पित घटना ! पण घडू शकते ! अशी घटना घडायला लाखो घटक कारणीभूत असतील -- त्यांत आपणही असू शकतो ! कोणतेच प्रश्न गंभीर आणि महत्त्वाचे न वाटता जगत राहणे, याचाच हा परिपाक असू शकतो ! हलगर्जीपणा, आळस आणि हेतूपूर्णता !"

June 20

"काही समर्थ लेखक मानवी क्रियाप्रतिक्रियांचे वस्त्रगाळ चूर्ण करून त्यातला एकेक कण सुटा करून दाखवू शकतात. त्या वेळी आपल्याला हेही भान येते की याच घटनाव्यूहात हे चूर्ण वेगळेही असू शकले असते आणि ते समर्थनीयही ठरू शकले असते. कारण वेगळ्या कारणमीमांसा आणि विश्लेषणेही देता आली असती. यालाच म्हणायचे जगण्यातल्या ॲब्सर्डिटीला स्पर्श होणे ! या पार्श्वभूमीवर एक प्रश्न येतो – कोणतीही व्यक्ती स्वतःच्या वा दुसऱ्या कोणाच्याच समजुतीच्या साच्याप्रमाणे वागू-जगू शकत नाही आणि तरीही समर्थने, संताप, नैतिकता हे सगळे चालूच ठेवते – म्हणजे, अस्वस्थतेत, क्रोधात, अपराधीपणात वा अहंगंडात जगणे, हेच माणसाच्या जगण्याचे अटळ स्वरूप असते, असे म्हणावे का ?"

June 18

"The ending of sorrow is the beginning of wisdom.
-- JK."

June 14

"बाकीचे जाऊ द्या, स्वतःचेच सगळेच चुकतेय असे वाटणे, पश्चात्तापाच्या वेळा निघून जाणे, अजूनही ' सुधारता ' न येणे, पद्धत न राहणे, सर्वमान्य वागणे नसणे, तरीही, अस्वस्थतेत जगत राहणे --"

"प्रत्येक नाते अपूर्ण, अर्धवट, असमाधानकारक --"

June 10

"' तुकाराम ' पाहिला.
तुकारामाचा भाऊ देवाच्या शोधात घर सोडून जातो -- तुकाराम संसारात राहून देवाला प्राप्त करतो ( म्हणजे काय, कोण जाणे ! ). पुढे जेव्हा एका ठिकाणी त्यांची गाठ पडते तेव्हा तो भाऊ म्हणतो, " मी बाहेर शोधण्याऐवजी आत शोधायला हवे होते का ? " -- हे वाक्य या सिनेमालाही लागू पडते. इथे ' बाहेरचा ' तुकाराम आहे, आतला शोधलेला नाही. अहो, आतला

तुकाराम शोधला तर बघायला कोण येणार ? म्हणजेच बाहेरचा धर्म सांगणारे पंडित आणि हा सिनेमा दोन्ही सारखेच म्हणावे लागतात.

आणि प्रेक्षकही जर आतला तुकाराम पाहण्यात इंटरेस्ट नसलेले असतील तर त्यांनाही तुकाराम-विरोधी म्हणजेच मंबाजीच्या बाजूचे का म्हणू नये ?"

June 9

"नुसते सुस्वभावी राहू नका, सावधही राहा ! फेसबुकमधून लॉगआऊट केल्यानंतर माझ्या समोर एक फ्रेंडशिप रिक्वेस्टची चौकट आली -- मी सहसा फ्रेंडशिप नाकारत नसल्याने ओके म्हटले तर एका मादक तरुणीचा फोटो आला -- त्यामुळे, धोका कळला आणि मी ते बंद करायचा प्रयत्न केला. ते बंदच होईना ! म्हटले, होणार घोटाळा ! सगळी बटणे बंद केली. सुदैवाने त्यात अडकलो नाही ! फेसबुकमधून बाहेर पडल्यावर फ्रेंडरिक्वेस्ट आली तर, फ्रेंडस, सावध व्हा !"

June 8

"भाकड काळ ..."

June 7

"माझे जुने मित्र आणि माझ्या अनेक नाटकांचे दिग्दर्शक रवींद्र लाखे यांना अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचा पुरस्कार जाहीर झालेला आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! पुरस्कार विजेत्यांत माझे आणखी बरेच मित्र आहेत -- त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन !"

June 4

"( स्वगत -- ) आज बराच खेळकरपणा झाला -- उद्यापासून नेहमीचे खेळकर-गंभीर राहावे ! ( आणखी आतले स्वगत -- ) आणि इथली उपस्थितीही जरा कमी करावी --"

"मित्रमैत्रिणी या नात्यांसाठी ही वडाची पूजा विस्तारित करावी काय ? वैवाहिक साथीदाराशी ती प्रतारणा ठरेल काय ?"

"या वर्षी हा वड, पुढल्या वर्षी दुसराच वड, असे होऊ नये म्हणून तरी पर्यावरण रक्षण करावे ! झाडे वाचवा, झाडे जगवा ! आणि मुख्य म्हणजे जगा आणि जगू द्या !"

June 3

" ग्राहकव्यथा
मानसिक त्रास सहन करण्यासाठी, शिव्या खाण्यासाठी वेगळी पगारी माणसे. तक्रार करायला फक्त त्याच माणसांचे टेलिफोन नंबर्स दिलेले. सविस्तर, नीट तक्रारीसाठी ईमेल आयडी द्यायचाच नाही. ज्याला रागाने बोलल्यास त्याच्या चेहऱ्यावर वेदना येतील, अशा जबाबदार माणसाचे अस्तित्वच जणू नाही. अनलिमिटेड म्हणायचे पण रविवारी सुट्टी असते, हे नंतर सांगायचे. पैसे पूर्ण आगाऊ घ्यायचे पण कबूल केलेली सेवा देण्यात खंड पडला तर त्याची कोणतीही जबाबदारी, विशेषतः आर्थिक, घ्यायची नाही. – असल्या सेवाक्षेत्री कंपन्या, त्यांचे नाव कितीही मोठे असले तरी, हाकलून लावणेच इष्ट. खरे तर, कंपनीची पूर्ण माहिती, पत्ता, सर्व आवश्यक टेलिफोन नंबर्स, ईमेल आयडीज, फॅक्स नंबर्स – हे सर्व देणे, या लोकांना बंधनकारकच हवे. असा कायदा आधीच असेल तर तो माहीत असलेल्यांनी इथे सांगून ठेवावा, म्हणजे तो न पाळणाऱ्यांबद्दल तक्रार करता येईल. कायदा आहे, पण तक्रार कुठे करायची, ते अजून ठरलेले नाही, अशी माहिती मिळाली तरी धक्का बसणार नाही ! परदेशांतले बाकी सगळे ( टाळाटाळीला उपयोगी पडणारे ) चोरायचे पण कार्यक्षमता सोडून द्यायची ! कुणालाच वेळ नाही, त्यामुळे, असल्या फसवाफसवीत लोकांचे करोडो रुपये वाया जात असावेत, असे मला वाटते. सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी, ते काय विकत आहेत, कोणत्या जबाबदाऱ्या घेत आहेत आणि त्या त्यांना पाळता न आल्यास त्याची भरपाई कशी होणार आहे, हे लेखी कबूल करण्याचे त्यांच्यावर बंधन हवे. ग्राहकमंचाकडे / न्यायालयाकडे ईमेलने तक्रार देणे, पुरावे पाठवणे – हेही मान्य व्हायला हवे. फसवले जाणाऱ्यांना त्रास फारसा न होता फसवणाऱ्यांना त्रास झाला तर फसवणुकीचे प्रमाण कमी होऊ शकेल. प्रत्येक विक्रीमालाच्या स्वीकृत जबाबदाऱ्यांसोबतच त्या जबाबदाऱ्या घेणाऱ्यांची पूर्ण माहिती आणि संबंधित ग्राहक न्यायालयाचे पत्ते, ईमेल-आयडी व टेलिफोन नंबर्स देणे बंधनकारक असायला हवे. सेवाक्षेत्रातल्या लोकांचा भरपूर फायदा मान्य करूनही ग्राहक त्यांच्याकडून सेवा विकत घेतात, त्यापुढे आणखी फसवणूक व्हावी हे अयोग्य आहे. असे होणे हे कुणालाच मान्य होणार नाही. या बाबतीत काही विचार झाला आहे का , कायदे आहेत का – याची लोकांना माहिती देण्याची यंत्रणा काय आहे – याबाबत खरे तर सविस्तर लेखच यायला हवेत. तसे घडताना दिसत नाही. किंवा माझी माहिती कमी असू शकेल. मुद्दा तो नाही. या क्षेत्रात नीटपणा येण्यासाठी तातडीने योग्य पावले उचलणे गरजेचे आहे, हे निश्चित ! ज्या कामासाठी पैसे घेतले जातात त्यापासून सुटका

करून घेण्याची मुभा असू नये. की नुसते पैसे घ्यायची हौस आहे पण स्वीकृत कामाबद्दल आत्मविश्वासच नाही ? एकूण व्यवहारात वापरलेले हुशारीचे, खरे तर घाबरट, मार्ग पाहता तसेच वाटते. असल्या लोकांच्या नाकामीची शिक्षा ग्राहकांना होऊ नये, अशी काही, ग्राहकांना सोपी असणारी, यंत्रणा हवी. नुसती महागाई आपल्याला दिसते, त्यात ही फसवणुकीची टक्केवारी वाढवायला नको ? हे बटण दाबा, मग ते बटण दाबा आणि मग ' कोण बोलतेय ? ' तर ' सुरेश ' आणि तो नुसता त्यांच्या ईंजिनियरला निरोप द्यायला फक्त जबाबदार – या असल्या भंगार पद्धतीवर तर बॉंबच टाकायला हवा ! "

"फेसबुकचे व्यसन लागते, हा काही फेसबुकचा दोष नाही."

May 2012

May 28

"You see, Sir, the gentleman asked, ' Would you offer an opinion about Gandhi ?' or about X Y Z. Only fools offer opinions. Why should one have an opinion about another ? It is such a waste of time and energy. Why should one clutter up one's brain, one's mind, with opinions, judgments, conclusions ? They prevent clarity and that clarity is denied when the mind observes with a conclusion. ---- J. Krishnamurti."

May 27

"आपल्या डोक्यात आलेले प्रेम, राग, लोभ, तिरस्कार, उत्सुकता, समाधान -- एवढेच जगणे ?"

May 26

"माझी आई ८८ वर्षांची आहे. आमची मुलगी -- तिची नात -- इथे राहायला आल्यावर तिने भाजीमंडईत जाऊन यायची इच्छा सांगितली. त्याप्रमाणे तिची नात तिला मंडईत घेऊन गेली. तिने सगळ्यांच्या आवडी लक्षात ठेवून भाज्या खरेदी केल्या. सगळ्यांबद्दल प्रेम व्यक्त करायची ही तिची एक वेगळीच पद्धत ! ( आता त्या भाज्या संपवण्याचे प्रयत्न सुरू आहेत ! )"

May 23

"आपण किती वाईट आणि बाकी सगळे किती चांगले -- हे सत्य डोक्यात बिंबवणे -- हे दारूचे कामच असावे की काय !"

May 22

"कलेची प्रमुख कृती ही जगण्यात श्रेयस जागवणे, ही असते -- असे म्हटले तरी आपल्या चर्चेसाठी, ' म्हणजे काय ', हा प्रश्न उरतोच !"

May 21

"कादंबरी ही वास्तववादी असायला हवी, ती किमान ३०० पानांची हवी, तिने त्या त्या काळातल्या समाजवास्तवाच्या दस्तावेजाचेही काम केले पाहिजे, तिने सगळा जगण्याचा माहोल तपशीलवार उभा केला पाहिजे आणि ती ' भूमिका ' घेऊन लिहिलेली असली पाहिजे -- या मुद्यांवर इथल्या मित्रमैत्रिणींचे काय विचार आहेत ?"

May 20

"डॉ. तस्लिमा नासरीन यांची ' उधाण वारा ' ही अनुवादित कादंबरी ( अनुवाद -- विलास गिते आणि मेहता प्रकाशन ) वाचली. त्यांचे हे मी वाचलेले पहिलेच पुस्तक. या ग्रेट लेखिका आहेत. जगण्याचे असे अंतर्बाह्य भान क्वचितच दिसते. यांना मनःपूर्वक सॅल्यूट !"

"फेसबुकसारखे दिसणारे लॉगिन पेज पाहून त्यावर पासवर्ड टाकल्यामुळे माझे फेसबुक अकौंट तात्पुरते स्थगित झाले होते. त्याचे आणखी काही दुष्परिणाम झाले असल्यास माहीत नाहीत. एका अनुभवानंतर प्रायव्हसी सेटिंग्ज बदलूनही हे घडले आहे. सर्वांनी काळजी घ्यावी. असे होऊ नये म्हणून मला काही सूचना देता येत असेल तर तीही कृपया द्यावी."

May 17

"उधळपट्टीची संधी फेसबुकइतकी कुठेच नाही !"

May 12

"दुसऱ्याच्या यशाने हुरळून त्याला ग्लॅमर बहाल करणे वा स्वतःच्या श्रेष्ठत्वाच्या भावनेतून दुसऱ्याला क्षुद्र समजणे, या दोन्ही, मानवी मनाच्या मूर्ख आणि विकृत अवस्था आहेत."

May 9

"कोणत्या ना कोणत्या नशेत / झिंगेत राहा, आयुष्य आपोआप जगून होईल !"

May 6

"समजा मला हिंदी सिनेमाची जुनी गाणी ऐकायला आवडतात, पण एक वेळ अशी येते की मला गाणे सहन होत नाही, समजा मला तुकाराम वाचणे हे जिवाभावाचे वाटते, पण अशा वेळी तो मला प्रचंड भयभीत करतो --"

May 5

"सगळ्यांचे दिनक्रम चालू तर दिसतायत व्यवस्थित !"

May 3

"कव्हरला आमच्या घराच्या टेरेसमधून दिसणारे दृश्य टाकले. फोटो कुठला, कसला आहे, हे लिहायला एका तरी ओळीची सोय हवी होती."

"स्त्री-पुरुष संबंधात दोघांनाही असणाऱ्या एकमेकांबाबतच्या पझेसिव्हनेसची कारणे स्त्रीची वेगळी आणि पुरुषाची वेगळी, असे असते, की समानच -- तीच असतात दोन्हीकडे कारणे ?"

May 2

"' सत्यवचनी ' म्हणजे काय ?"

May 1

"शहरांत फिरतो, खेड्यांतही जातोयेतो
माझा कंटाळा, आळस आणि बेशुद्धी
जिवंतपणा मिरवतात जोवर मीच
काढलेल्या आठवणीने जागी होत नाही
माझी निद्रिस्त प्रिया --"

April 2012

April 30

"शरीराशिवाय मन नसते, हे शास्त्रीय सत्य आहे. एखाद्या गोळीचा साईड इफेक्ट वा ड्रिंकमुळे राहिलेले परिणाम, यांमुळे मनःस्थिती बदलते. किरकोळ प्रश्नही खूप त्रासदायक वाटतात. हे पाहता, प्रश्नांचे खरे गांभीर्य कसे मोजावे ?"

April 29

"फ्रंडस, इंग्रजी स्पेलिंगचे मराठी वाचायचे नाही, असे मी ठरवले आहे, राग मानू नये, ही विनंती."

April 28

"समजा आपल्या आवडीच्या गोष्टींत वेळ घालवता येणे ( उदा. आवडत्या कविता वाचणे वा स्वतः काही लिहिणे ) हे आपले ' जगलेले ' आयुष्य आणि आपल्या नावडत्या गोष्टींसाठी वेळ जाणे ( उदा. एखादे बिल भरण्यासाठी रांगेत उभे राहणे ) म्हणजे ' न जगलेले आयुष्य ' -- तर जगायला कितपत मिळते ?"

April 26

"काल एक क्लिप माझ्या अकौंटवरून काहींना गेल्याचे कळले. हे अर्थातच मी केलेले नव्हते. तज्ज्ञांना विचारून आता त्याबाबत काळजी घेत आहे."

April 25

"पहिली पुरणपोळी टांझानियात झाल्याची नोंद सापडते."

April 22

"या आधी कोट्यवधी बातम्या, घटना घडून गेल्या आहेत -- कुठे गेल्या त्या सगळ्या ? एकेका माणसाच्या इतक्या आठवणी तर एकूण माणसाच्या किती ? नुसती प्रसिद्ध म्हणावी अशीही लाखो माणसे आहेत ! आठवणीत ! खरेच या मानसिक साठ्याला आहे काही अर्थ ?"

April 19

"आम्ही स्थापन केलेली एक नाट्यसंस्था नव्या जोमाने कामाला लागण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. सध्या त्यात व्यस्त आहे -- मीटिंग ठरवणे, पत्रे पाठवणे, हिशोब पाहणे, वगैरे."

April 15

"कलावंत हा मुख्यतः रोमँटिक ( स्वप्नरंजनवादी ) असायला हवा आणि अगदीच आताच्या काळातला आणि त्यातल्या त्यात हुशार असा हवा असेल तर तो निराशावादी किंवा डाव्या विचारसरणीचा असायला हवा."

April 13

"मौल्यवान कला डेंजरस असते."

April 12

"नुसते सवयीचे जगत राहिले की कंटाळा येणारच !"

April 10

"गेले दोनतीन दिवस फेसबुकवरची फ्रेंडसची वर्दळ कमी झालेली दिसतेय. हनुमान जयंतीमुळे तर नसेल ?"

April 9

"न सुटलेल्या प्रश्नांची अस्वस्थता मन प्रदूषित व त्रस्त करत राहते ."

April 4

"अन्नू मलिक म्हणाले होते की पूर्वी भरपूर रेंगाळत राहायचे आणि मग सावकाश ' माझे तुझ्यावर प्रेम आहे ' असे म्हणायचे, अशी पद्धत होती; आता मुलामुलींचे निर्णय झटपट होतात; त्यामुळे गाण्यांत आता मेलडी शक्य नाही."

March 2012

March 31

"मित्रमैत्रिणींशी गप्पा मारणे, चर्चा करणे हा काही माझा धंदा नाही. त्यामुळे, एफबीवरच्या माझ्या ( कदाचित ) ओव्हरएक्सपोजरमुळे माझा कचरा होईल की काय, याचा मी विचार करत नाही."

"काळाचा महिमाच असा आहे की स्त्री-पुरुष नात्यातले पझेसिव्हनेसचे प्रमाण आपोआप कमी होत चालले आहे -- हे खरे की खोटे ?"

March 30

"सारखे कुणी कुणाला फसवत नसले तरी ' विश्वास ' या शब्दाचा अर्थ बदलत चालला आहे, हे खरे !"

March 26

"प्रत्येक घोटाळ्याचा ट्रॅक ठेवणे, त्याच्या चौकशीच्या, पुराव्यांच्या वगैरे नोंदी लक्षात ठेवणे, हे अशक्य आहे, हे एक आणि किती कचरा सांभाळू डोक्यात, हे दुसरे. तसेच मग अमुक साली यूपीत काय झाले होते, तमुक साली कुणाच्या किती सीटस होत्या -- हेही ! असे बरेच ! प्रचंड ! काय लक्षात ठेवायचा प्रयत्न करणे योग्य होईल, एवढाच आता प्रश्न आहे !"

March 25

"करमत नसताना कर्म की करमणूक ?"

"१. कसे जगायचे ते मला समजते. २. कसे जगायचे ते मला समजत नाही, तुम्ही शिकवा. ३. कसे जगायचे ते तुम्हाला समजत नाही, मी शिकवतो. ४. कसे जगायचे ते आपल्याला दोघांनाही समजत नाही, मी शिकायला तयार आहे, तुम्ही शिकायलाही तयार नाही. ५. कसे जगायचे ते कुणालाच समजत नाही."

March 22

"माणसाचे मन ही एक आत्मक्लेशाची आणि पर्यायाने परक्लेशाची यंत्रणा आहे."

March 21

"' सत्याला मरण नाही ' या वाक्याचा अर्थ काय करावा ? की हे वाक्यच असत्य आहे ?"

March 18

"समजा मेंदूतली दुःखाची जागा कळली -- एका इंजेक्शनने सगळी दुःखे एका क्षणात नष्ट करणे शक्य झाले -- याला माणसे तयार होतील ? सकारण बोला."

March 16

"सुमारे १०-१५ व्यक्तीच आपल्या संपर्कात उत्सुकता असलेल्या आहेत, असे दिसते -- मला संख्येचा प्रश्न नाही, मी प्रायोगिकवाला आहे -- पण कशासाठी १००० मित्रमैत्रिणी ? -- असा प्रश्न पडतो --"

March 14

"“We have, in fact, two kinds of morality side by side; one which we preach but do not practice, and another which we practice but seldom preach.”
-- Bertrand Russell ."

March 13

March 11

"मन असणारच असेल तर अस्वस्थ मनाचे स्वस्थ मन कसे होणार ? कोणताही मानसिक संघर्ष म्हणजे अस्वस्थता असेल तर ' स्वस्थ मन ' असू शकते ?"

March 9

"आजच्या ' पुणे लोकसत्ता ' मध्ये माझ्या ' वस्तू ' या नाटकाचे परीक्षण आले आहे. जरूर पाहावे. आणि पुण्यातल्या कुणी त्याची लिंक इथे द्यावी. ( कारण ते काम मला येत नाही. )"

March 8

"स्वतःच्या वर्चस्वाची मानसिक गरज वाटावी याची कोणकोणती कारणे असू शकतील ?"

February 2012

February 27

"मनाला एक कट्टरपणा-रिजिडिटी-मर्यादितपणा आणणे हा जर मृत्यू असेल आणि मनाचा तरलपणा-संवेदनशीलता-समावेशकता जर जिवंतपणाचे लक्षण असेल तर सध्या भरपूर माणसे आत्महत्येच्या दिशेने जात आहेत, असे म्हणता येते."

February 25

"मुलाखतीत एखादा माणूस म्हणतो, " मी तृप्त आहे, जीवनाने मला सगळे दिले ! " -- हे वाक्य कितपत खरे, कितपत दिखाऊ, कितपत भ्रमिष्टपणाचे समजावे ?"

February 23

"बऱ्याच स्त्रिया एफबीवर जन्मतारीख देतात पण जन्मसाल देत नाहीत -- याची कारणे कोणकोणती असू शकतील ? स्त्रियांनीही यावर कॉमेंटस दिल्या तर जगणे समजायला सगळ्यांनाच मदत होईल. प्रश्न दिसतो साधा पण --"

February 10

"केतकीने वरचे दोन सा मिळवलेले आत्ता पाहिले. या निवडणुकीसाठी आपल्या इथल्या फेसबुकवाल्यांचीही प्रतिनिधी म्हणावी अशी ती एक अनमोल उमेदवार आहे ! तिचे अभिनंदन आणि शुभेच्छा !"

February 2

"तुम्हाला फारसे कुणी ओळखत नाही, कुणी ग्रेट म्हणत नाही, कुठल्याच क्षेत्रात तुम्ही फारसे अद्वितीय असे काही केलेले नाही, तुम्ही साधे रूटीन सुखदुःखांनी युक्त असे रूटीन आयुष्य जगत आलेले आहात, असेच दिसते -- तरीही या आयुष्याला mediocre वा निरर्थक असा शिक्का मारता येईल ? ' अर्थपूर्ण ' असण्याच्या शक्यता कोणत्या ?"

January 2012

January 29

"समजा एखाद्या हिंदुत्ववाद्याला एखादा पुरोगामी हा प्रतिगामी, नालायक आणि फालतू म्हणतो तर हिंदुत्ववाद्याने ते कितपत मनावर घ्यावे ? आणि ही जर फक्त मतमतांतरे असतील तर कुणीही कुणाच्याही केलेल्या मूल्यमापनाला कितपत अर्थ असतो ? विचारप्रणाल्या सोडूनही आपले माणसांना जोखणे, त्यांची स्तुती वा हेटाळणी करणे हे कितपत अर्थपूर्ण असते ?"

"फ्रेंडस, आपले मित्र सतीश तांबे आणि प्रवीण बांदेकर ( तसेच लोकनाथ यशवंत व जी. के. ऐनापुरे ) यांचे आजच्या मटामधले लेख जरूर वाचा. नंतर इथे त्यावर चर्चा झाली तर फारच छान !"

January 25

"' मिती चार ', कल्याण या संस्थेने सादर केलेला ' सर्व्हायव्हल ' हा दीर्घांक काल पाहिला. डॉ. संजय रणदिवे लिखित आणि रवींद्र लाखे दिग्दर्शित असे हे नाटक अनेक तात्त्विक प्रश्नांची घुसळण करणारे होते. सादरीकरण अवघड होते. लाख्यांचे अत्युत्कृष्ट दिग्दर्शन आणि ललित-माणिक जोडीचा लाजवाब अभिनय यांमुळेच ते शक्य झाले. सत्तर मिनिटांचे उत्तम संवाद-नाट्य ! अभिनंदन !"

"काही गोष्टी अनुकूल घडल्या की वाटते, आता जगण्यातली अभावांची पोकळी भरली जाईल ! पण तसे होऊच शकत नाही -- मनाची हालचाल म्हणजे अभावांचीच हालचाल ! अभावांची त्रासदायक जाणीव नसलेले जगणे असू शकते का -- या प्रश्नाचे काय करावे ?"

9:40am

"काही गोष्टी अनुकूल घडल्या की वाटते, आता जगण्यातली अभावांची पोकळी भरली जाईल ! पण तसे होऊच शकत नाही -- मनाची हालचाल म्हणजे अभावांचीच हालचाल ! अभावांची त्रासदायक जाणीव नसलेले जगणे असू शकते का -- या प्रश्नाचे काय करावे ?"

January 23

"एखाद्या मानवी संबंधात आपले काही तरी चुकले आहे असे वाटणे पण त्याचे निराकरण कसे होणार हे माहीत नसणे आणि याचा ताण मनात निर्माण होणे -- याकडे आपण कसे पाहतो ? हा प्रश्न आपण किरकोळ, रूटीन समजतो की जगण्याची पद्धतच आव्हानात आणणारा समजतो ?"

January 22

"तणावग्रस्त मन म्हणजे सुखासाठी हपापलेले मन. अशी मने समतेबाबतच्या बौद्धिक चर्चांची कितीही डोकेफोड करोत, ती वांझ ठरेल. समतेचे जगणे अस्तित्वात येणार नाही. नीती-अनीती, निष्ठा-व्यभिचार, वर्चस्व, दबावतंत्र -- अशा प्रश्नांत तडफडतच जगावे लागेल. भ्रमिष्ट आदर्शवादाचा काय उपयोग ?"

January 15

"वाचनासाठी सर्वोत्तम वेळ -- चिवडा, कांदेपोहे, समोसा, बटाटेवडा अथवा भजी खाताना. वाचनाची पूर्तता -- आपण जे वाचतोय त्यावर किमान एक तरी डाग पाडण्यात."

January 5

"सगळेच उथळ, तात्पुरते असेल, वैश्विक वा सत्य असे काही नसेल, मूल्यबिल्य सगळे झूट असेल, तर मग ' संस्कृती ' हा शब्द भाषेतून काढूनच टाकावा काय ?"

December 2011

December 30

"एक पुरुष, एक स्त्री -- हा जमाना संपत आलाय का ? स्त्रियांनाही वैविध्य आवडते -- हे सत्य एका स्त्रीनेच मांडलेले वाचले -- हा धक्का आहे ? की मानसिक संघर्षात जगणे म्हणजे नैतिक जगणे ? आपण मित्रमैत्रिणी असूनही मोकळेपणाने बोलू शकत नाही, हे इथेही दिसून येईल !"

December 25

"पं. सत्यदेव दुबे आज गेले. माझे ' नाणेफेक ' हे नाटक कै. चेतन दातारने त्यांना वाचून दाखवले होते. त्यांना ते आवडले आणि त्यांनी ते दिग्दर्शित करायचे ठरवले. चेतनकडे त्यांनी उपस्थित केलेल्या दोन प्रश्नांमुळे काही भाग पुनर्लेखन करून मी त्यांना पाठवला. १९९४ मध्ये त्यांनी ते नाटक दिग्दर्शित केले. त्यांच्यामुळे माझी संहिता नीट पूर्ण झाली. त्यांनी नाटक बसवणे हे रेकग्निशनच होते. अभिवादन !"

"स्त्री-पुरुष सहवास / संबंध यांतल्या संपन्नतेचे मुख्य सूत्र -- आपले बोलणे, वागणे, कृती यांतून साथीदाराच्या चेहऱ्यावर येणारे समाधान / आनंद, हेच. या सूत्राचे प्रमाण कमीजास्त असणार हे खरे असले तरी सूत्र हेच . त्यामुळे, इथे घेण्यापेक्षा देणे महत्त्वाचे ठरते. जगण्यातल्या सर्वोच्च आनंदाचे हे सूत्र असण्याचा एकूणच जगण्याशी काय संबंध असेल ?"

December 16

"आज प्रसिद्ध होणाऱ्या ' साधना ' साप्ताहिकाच्या २४ डिसेंबरच्या अंकात असलेला माझा ' मराठी नाटकाचे गुणदोष ' हा लेख शक्य झाल्यास पाहावा."

November 7

"' भाषा नव्हे, मराठी मानसिकता कालानुरूप व्हायची गरज आहे ' -- हा ' अंतर्नाद दिवाळी २०११ ' मधला, विवेक सावंत यांनी लिहिलेला लेख माहितीपूर्ण, दर्जेदार आणि महत्त्वाचा वाटला ."

October 2011

October 26

"' अक्षर ' दिवाळी अंक एकूणच चांगला आहे. आपले मित्र सतीश तांबे यांची उत्तम दीर्घकथा, आणि स्वप्नील चव्हाण, ओंकार कुलकर्णी, स्मिता गानू जोगळेकर, शर्मिला रानडे, प्रणव सखदेव या सर्व मित्रमैत्रिणींच्या उत्तम कविता, असा जणू आपल्या एफबीवाल्यांचाच अंक आहे. यातला विश्राम गुप्ते यांचा ' आठवण ' हा लेखही महत्त्वाचा आहे."

September 2011

September 30

"घेताना मन विभक्त होते, देताना ते एकसंध होते.
मानसिक घेणे थांबू शकेल ?"

September 29

"The observer is the observed. -- हे जेकेंचे म्हणणे ' अध्यात्मिक ' म्हणून हेटाळून सोडून देण्यासारखे आहे ? बरेचसे हार्ट ॲटॅकस हे, हे समजून न घेतल्यामुळे होत असतील, असे वाटते. एखादा प्रसंग, त्याच्या मानसिक परिणामांमुळे, माणसाला बसल्या ठिकाणी पाच मिनिटांत खलास करू शकतो, हे आपल्याला जाणवते की नाही ?"

September 19

"पुरुषोत्तममध्ये पहिली आलेली एकांकिका ' सीरियल किलर्स ' पाहिली. वारंवार गर्भपाताचे प्रसंग आणणारी सुखवादी मुलेमुली आणि त्यांतून निर्माण होणारे गुंताडे हा विषय. हे समाजवस्तव असल्याचे सगळ्यांना मान्य.
या तथाकथित सुशिक्षित मुलामुलींना सेफ सेक्साचे महत्त्व कळत नसेल ? पालकांनी हे पाल्यांना समजावणे आवश्यक आहे ? पालकांनी स्वतःच्या जीवनातून जुन्या नीतिमूल्यांचे उच्चाटन करत जाणे हा एक ' एकोपा ' साधण्याचा उपाय ठरू शकेल ?"

September 15

"It is only the earnest, serious person who knows what life is, what living is, not the man who seeks amusement. -- JK."

September 1

"' आवरण ' कादंबरी, मूळ कन्नड लेखक डॉ. एस. एल. भैरप्पा, मराठी अनुवाद उमा कुलकर्णी, प्रकाशक मेहता २००९ -- वाचली. माणसाच्या जगण्यातल्या गुंतागुंतीचा आणि ॲब्सर्डिटीचाही अवाढव्य आवाका. स्तिमित व्हावे अशी कलाकृती. शेवटच्या भागात, ही जणू एक सामाजिक समस्या असून तिचा काही योग्य वैचारिक भेद होणे आवश्यक आहे,

अशा निष्कर्षाकडे लेखकही झुकू लागतो आणि एवढे प्रतिभासंपन्न आकलन आपली गहनता आणि उंची सोडून खाली येते, असे जाणवले."

August 2011

August 30

"' मैत्रीत अनौपचारिकता आणण्याचे शंभर नुस्खे ' जर कुणी लिहू शकले तर प्रचंड खपेल. काही दिवस त्या प्रभावाने अनौपचारिकता येत राहील. नंतर ते तंत्र-मंत्र असल्याच्या भानामुळे त्याचा प्रभाव जाईल. पण, तोपर्यंत बरीच जमीन पादाक्रांत झालेली असेल, ती कुणी सोडणार नाही. असे होईपर्यंत ज्यालात्याला / जिलातिला आपापले नुस्खे शोधावे लागतील."

August 24

"मी केंद्र आणि बाकीचे अ-केंद्र असे सगळ्यांचेच जगणे आहे. त्यामुळे बिनभ्रष्टाचारी माणूस ही कल्पनेनेही समजू न शकणारी गोष्ट आहे. घाबरा होऊन माणूस मधेच प्रमाणावर किंवा प्रकारांवर नियंत्रण आणायचा प्रयत्न करतो. माझी विचारसरणी, माझा पक्ष, माझी जात यांचा फायदा करून घेणे, त्यांचा अभिमान बाळगणे हे सगळे सगळ्यांना मान्य असते. आणि तुफान विनोदी नाटक म्हणजे भ्रष्टाचारमुक्त जग निर्माण करायचा विडा अधूनमधून यांतलेच काहीजण उचलत असतात."

August 21

"गाओ झिंगझिआनची ' सोल माउंटन ' ( अनुवाद -- मधू साबणे ) वाचली. उत्तम मराठीत उत्तम अनुवाद. लेखकाची परिपक्वता, अनुभव-समृद्धी, माणसाचा इतिहास आणि अनेक संस्कृतींचे जगणे-मरणे, निसर्गाची शेकडो रूपे आणि अविरत प्रवास यांबरोबरच असंख्य स्त्री-पुरुष पात्रांचे येणेजाणे यांचे सातत्य आहे पण अमुक पात्रांचे, त्यांच्या कहाणीचे सातत्य असे नाही -- अशी एक वेगळीच कादंबरी. या फॉर्मला म्हणणारे काहीही म्हणोत, पण महान वाचनाचे समाधान मिळते, हे मात्र खरे !"

July 2011

June 2011

June 22

"' द रीडर ' -- मूळ जर्मन कादंबरी ः बर्नार्ड श्लिंक, मराठी अनुवाद ः अंबिका सरकार, वाचली. काही बाबतीत ' पटण्या ' चे प्रश्न वाटले, पण अशा कादंबरीत, जाने दो. मानसिक क्रियाप्रतिक्रियांतून जगण्यातले जे एक ' अटळपण ' ( नियती ) व्यक्त होते त्याला तोड नाही. अत्यंत सूक्ष्म कामाचे भरीव शिल्प !"

June 16

"स्त्रीजन्म
पुरुष कमकुवत असलेल्या संबंधातून मुलीचा जन्म होतो, अशी एक समजूत कानावर आली. ही समजूत कुठून आली, तिला काही शास्त्रीय आधार आहे का, हे मला माहीत नाही. स्त्रियांना समतेने जगू देण्याच्या बाबतीत जगात अफगाणिस्तान, काँगो, पाकिस्तान आणि भारत हे चार देश सर्वात नीचस्तरावर आहेत असे एक संशोधन प्रसिद्ध झाले आहे. यातून स्पष्ट होणाऱ्या तालिबानी मनोवृत्तीचे अस्तित्वच वरील समजुतीत दिसते. तज्ज्ञांनी प्रकाश टाकावा."

June 13

"समजा एकटेपणाच्या शौकीन माणसाला दुसऱ्यांना न दुखवता जगायचे आहे, तर त्याला कोणते उपाय, मार्ग सुचवता येतील ? उदा. वेळेला तो उपयोगी पडू शकतो, अशी पार्श्वभूमी तयार करणे. आणखी ?"

June 9

"अमर्यादितता असू शकत असेल तर मर्यादितता असू शकत नाही आणि मर्यादितता असू शकत असेल तर अमर्यादितता असू शकत नाही."

May 2011

May 18

"एकच सध्या काय महत्त्वाचे वाटतेय ते ठरव आणि ते पूर्ण कर -- माझा मीच मलाच दिलेला सल्ला !"

May 11

"सर्व फ्रेंडसना शुभेच्छांबद्दल धन्यवाद ! तुम्हालाही सर्वांना माझ्या शुभेच्छा !!"

April 2011

April 24

"आजच्या लोकसत्तेतल्या एका लेखाप्रमाणे मेंदूतली न्यूरोप्सीन या द्रव्याची अतिरिक्त निर्मिती गोळ्या अथवा प्रतिबंधक लस तयार करून थांबवता येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे आणि त्यामुळे, ताणतणाव, चिंता, काळजी, उदासीनता वगैरे माणसाचे प्रश्न मिटूनच जाण्याची शक्यता आहे ! म्हणजे कलानिर्मितीचे क्षेत्र बंदच होईल की काय ? आणखी काय काय होईल ?"

April 3

"आजच्या ' सकाळ ' च्या ' सप्तरंग ' पुरवणीतला सचिन कुंडलकर यांचा ' सामाजिक ' हा लेख जरूर वाचावा. आपले कलाक्षेत्र खुजे करण्याचे काम फक्त हिंदुत्ववादी किंवा इतिहासप्रेमी संघटनाच करत नसून तथाकथित बांधिलकीवाले -- भूमिकावालेही करत आहेत, हे आपण लक्षात घ्यायला हवे."

March 2011

March 22

"पुरोगामी लेखक विरुद्ध प्रतिगामी लेखक अशी ढोबळ मांडणी करणाऱ्या आणि ती खरोखरच अस्तित्वात असते असं मानणाऱ्या सुबोध पण वावदूक मराठी साहित्यिक पर्यावरणात ' त्यांचा ' ( म्हणजे इथला नसलेला ) लेखक वेडाच भासतो. -- विश्राम गुप्ते, ' खेळ ', दिवाळी २०१०."

"ह्या ( म्हणजे आपल्या ) सांस्कृतिक पार्श्वभूमीवर ' माझं काम जगात परिवर्तन करणं नाही तर माझं काम जीवनाचं यथास्थित चित्रण करणं हेच आहे ' असं सांगणाऱ्या सारामागोवर मराठी साहित्याच्या हौशी आणि लोकप्रिय रंगमंचावर प्रतिगामी म्हणून दगडफेक होऊ शकते. -- विश्राम गुप्ते, ' खेळ ', दिवाळी २०१०."

March 17

"People who learn some accurate detail of another person's life at once deduce consequences which are not accurate, and see in the newly discovered fact an explanation of things that have no connexion with it whatsoever.
--- MARCEL PROUST ."

March 16

"ज्या डावेपणाची महाराष्ट्रीयांनी राजकीय क्षेत्रातून हकालपट्टी केली तोच डावेपणा महाराष्ट्रीयांच्या सांस्कृतिक क्षेत्रात फोफावावा, हे महाराष्ट्रीयांच्या दुभंग व्यक्तिमत्वाचे लक्षण आहे का, यावर तज्ज्ञांचे विचार कळावे, असे वाटते."

March 13

"आजच्या मटामध्ये १. ' निर्मिकाच्या नियतीच्या शोधात ' हा गुरुनाथ धुरींवरचा, आपले मित्र प्रवीण बांदेकर यांचा लेख तसेच २. रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीवरचा गोविंद काजरेकर यांचा लेख -- जरूर वाचावेत."

February 2011

January 2011

January 15

"फुलपाखराचे पंख.
फुलपाखराचे पंख -- चं. प्र. देशपांडे. इकडे फुलपाखराने पंख फ..."

January 11

"मी इतरांचे मुखवटे फाडायला निघालो आहे -- हा माझाही एक मुखवटाच असतो की नसतो ?"

January 9

"समजा एका ठिकाणी माझे पोस्टिंग आहे, तिथून बऱ्याच अंतरावर माझे कुटुंब आहे आणि तिथे काही समस्या आहे, मी रजा घेऊ शकत नाही, माझी जवळ कुठे बदलीचीही शक्यता नाही -- असा नियतीचा बंदोबस्त अनेकांच्या आयुष्यात येतो. प्रत्यक्षात यावर मार्ग निघणे, होईल तेव्हा होईल, तोवर मानसिक प्रश्नाचे काय ?"

January 8

"मृत्यूची भीती म्हणजे आहे ते नाहीसे होण्याची भीती. तो येईपर्यंत आहे ते नाहीसे होण्याचा प्रश्न नाही आणि तो आल्यावर ते नाहीसे झालेले कळायचा प्रश्न नाही ! सारांश, आहे ते कधीच नाहीसे होत नाही !"

January 6

"बेकारीचा पुरवठा वाढल्याने सुपारी स्वस्त !!!"

December 2010

December 24

"असे असेल तर हे बटण दाबा, तसे असेल तर ते बटण. कोण बोलतंय ? सुरेश. दुसऱ्या वेळी -- सुरेश का ? नाही, सुरेश नाही . ( मनात -- ) अरे मग कोण भोसडीच्या ? मी कन्सर्नड माणसाकडे देतो. ( मनात -- ) तू कोण च्युत्तड ? ( उघड -- ) हं, असा असा प्रॉब्लेम आहे. हं, नोंदवून घेतलाय. तीन दिवसांनी माणूस येईल.
( तीन दिवसांनी -- ) कोण बोलतंय ? मी दिलीप. सुरेश पोचला का दिल्लीला ? वगैरे. पण चाललाय देश !!!"

November 2010

November 17

"' कालनिर्णय ' दिवाळी अंकात पृष्ठ २१८ वर चंद्रकान्त पाटील यांनी कवितेबाबत लिहिलेले ' मनोगत ' वाचावे. कवी आणि कवितेचे वाचक यांना मस्ट. एका पानात उत्तम मजकूर !"

October 2010

October 20

"संगीतातला ग्रेटनेस आणि लेखनातला ग्रेटनेस हे वेगवेगळे नसतात. खूप कलाकृतींतून ग्रेटनेसला सामोरे जाणे आणि एका कलाकृतीतून ग्रेटनेसला सामोरे जाणे यांत काहीही फरक नसतो. -- याच्या सत्यासत्यतेवर वरील वाक्याचा विचार करावा."

October 19

"संगीत, लेखन, चित्र वगैरे माध्यमांतून खूप कलावंतांनी ग्रेट अभिव्यक्ती दिलेली आहे. या बाबतीत, हे वाचले का, ते ऐकले का असे श्रीमंती कमावण्याचे वातावरण तयार होऊ द्यावे का, असा प्रश्न पडतो. त्या ग्रेटनेसवर त्या माध्यमांची अथवा त्या संबंधित कलावंतांचीही मालकी असू शकत नाही. तो ग्रेटनेस जे स्वतःत अवतरू देतील त्यांना इतक्या संपर्कांची काय आवश्यकता राहील ? ग्रेटनेसची वखवख का होते ?"

October 10

"अपमानित होणे, जवळचे कुणी गेल्याने वा कोणत्याही नुकसानाने दुःखी होणे, स्वतःची प्रतिमा भंग पावल्याने मृत्यूचे दुःख भोगणे -- यांवर हिंदुत्ववाद, समाजवाद, साम्यवाद वा कोणतीही विचारसरणी काय म्हणेल ?"

September 2010

August 2010

August 27

"भाषेची सूक्ष्मार्थता, अनेकार्थता, अर्थसमृद्धी, अचूकार्थता हे सर्व नाकारले जात असून साळढाळपणाकडे कल दिसतो. याने भाषा कमकुवत होत जाईल. विचारक्रिया ही भाषेवर अवलंबून असल्याने तीही कमकुवत होईल. याचे काय काय परिणाम होतील ? आपण ढ ( डल ) होत जाऊ ?"

August 25

Chandrakant shared a link.

Champra Lekhan

www.champralekhan.com

"www.champralekhan.com ही माझी वेबसाईट अपडेट केली आहे. ' सांस्कृतिक ऱ्हासाचे गुऱ्हाळ ', ' नाटक आणि नैतिकता ', ' साहित्याच्या मूल्यमापनाचा पेच ' -- या लेखांसह."

August 23

"आपली बाजू शाबीत करण्याचा वा बदला घेण्याचा विचार चालू असेपर्यंत झालेल्या अपमानाच्या दुःखातून बाहेर पडता येत नाही, दोन्हींतून एकदमच बाहेर पडावे लागते."

August 19

"सगळे सारखे काहीतरी साजरे करत, उड्या मारत,करमणूकप्रधान हिंडत असतात. आपल्याला भुक्कड विनोदी, उथळ, सवयीतली, डल कला पुरे, असे ठरलेले दिसते. अशा लोकांचे हे साहित्यसंमेलन ! ते ग्लॅमरस होणे अटळ आहे ! याचे अध्यक्षपद म्हणजे सन्मान वगैरे काही नाही. एरवी मृतात्म्यांना फुले वाहिली जातात, हे मृतात्म्यांकडून हारगुच्छ मिळणे !"

"सर्जकता परिस्थितीवर अवलंबून नसते, परंतु, आपण परिस्थितीने गांजलेले, दुःखाने गंजलेले, ताणतणावग्रस्त, रोजच्या व्यापतापांनी वैतागलेले, कंटाळलेले लोक असून आपल्या डोक्याला कुठल्याही सर्जकतेचा ताप झेपणार नाही, अशी समजूत करून देण्यात आलेला आणि ती समजूत स्वीकारलेला आपला समाज आहे. सर्जकता हे श्रीमंत, खुशालचेंडू, व्यापतापहीन लोकांचे क्षेत्र असते, असा समज दिसतो !"

August 18

"एक क्षण तरी
काहीही न करण्याचा जिवंत
कर्मत्यागयोग
घडावा"

August 16

"काल स्टार प्रवाहवर डॉ. आशिष देशपांडे ( मानसोपचारतज्ज्ञ ) यांच्याशी प्रश्नोत्तरांचा एक कार्यक्रम होता. विषय होता, ' भाषेचे महत्त्व '. उत्तम ! खरे तर, हे डॉक्टर, एक शास्त्रज्ञ, एक शासकीय सेवेतील उच्च अधिकारी, एक संगणकतज्ज्ञ, अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या व्यक्तींकडून या विषयावर लिहून घेऊन त्याची अत्यंत कमी किंमतीत एखादी पुस्तिका वा पुस्तक होणे खूप महत्त्वाचे होईल असे वाटते."

August 15

"जात, भाषा, धर्म, संस्कृती यांची ओळख/अस्मिता टाकायला तयार आहे असे म्हणणाऱ्यालासुद्धा देश आणि विचारसरणी यांची ओळख/अस्मिता लागतेच. मुळातच फूटवृत्ती, फुटीर आणि फुटारू असणाऱ्या माणसाच्या एकत्र असण्याला कोणतातरी पाया लागतोच. हेच, माणसाच्या तथाकथित उत्तुंगपणाला शोकरसपूर्ण फुटकळपणा येण्याचे कारण असेल काय ? ' ओळख ' आणि ' अस्मिता ' हे समानार्थी शब्द समजावे काय ? म्हणजे, सगळेच कट्टर आणि अतिरेकी ?"
--- ००० ---